रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २६५

www.ramprahar.com

◆ मंगळवार, १४ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


पनवेलच्या 'ऑक्सिपार्क'मध्ये विनापरवाना वृक्षछाटणी/३

नेरळमध्ये गावठी दारू तस्करी उघड/७

आई गावदेवी यात्रेनिमित्त कुस्त्यांचे जंगी सामने/८


## राज्यात उष्णतेची लाट येणार; हवामान खात्याचा इशारा



**पुणे :** राज्यभर सध्या उन्हाचा चटका वाढला असून अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिक त्रस्त झाले असून हवामान खात्याने याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, विदर्भात तापमान सर्वाधिक नोंदवले जात आहे. हवामान खात्याने स्पष्ट केले आहे की, सध्या तापमान सरासरीपेक्षा २ ते ३ अंशांनी जास्त आहे. जरी काही ठिकाणी तापमान ४० अंशांपेक्षा जास्त असले तरी अद्याप 'हिट वेव्ह'ची स्थिती निर्माण झालेली नाही. मात्र येत्या काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता असून, त्यानुसार 'हिट वेव्ह'चा इशारा दिला जाऊ शकतो. दरम्यान, वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शासनाच्या भरती प्रक्रियेत सुधारणा

### राज्य मंत्रिमंडळाकडून विविध महत्त्वाचे निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

सरकारी नोकर भरतीत पारदर्शकता आणि सुलभता आणण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्य मंत्रिमंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. २०४७ पर्यंत महाराष्ट्र अधिक सक्षम आणि आधुनिक राज्य बनवण्याच्या उद्देशाने सरकारी नोकर भरती प्रक्रिया सुधारली जाणार आहे. सध्या एमपीएससीमधून सुमारे ५३ संवर्ग भरती होते, मात्र यापुढे ही संख्या १५३ पर्यंत वाढवण्याचा निर्णय राज्य सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे संयुक्त परीक्षेच्या माध्यमातून आधीपेक्षा जास्त सेवा भरतीसाठी उपलब्ध होतील.



त्यामुळे विद्यार्थ्यांना एकाच परीक्षेतून अनेक पदांसाठी संधी मिळतील. त्याशिवाय युपीएससीच्या धर्तीवर महाजॉब्स पोर्टलद्वारे निपुण सेतू उपक्रम राबवविणार असल्याचं राज्य सरकारने ठरवले आहे. थोडक्यात सरकारी भरती सोप्या पद्धतीने होणार आहे. मंत्रिमंडळातील निर्णय...

कुळगांव-बदलापूर मधील मंजूर विकास आराखड्यातील स्टेडीयमच्या आरक्षणात बदल करून वीज उपकेंद्राकरिता जमीन देणार. चार एकर जमीन टाटा पॉवर कंपनीस हस्तांतरीत करण्याचा निर्णय. मुंबईत आयईएस स्किल टेक विद्यापीठ होणार. विद्यापीठ स्थापनेस मंजुरी. कायम स्वयंअर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठाच्या स्थापनेमुळे कुशल मनुष्यबळ विकासाला चालना मिळणार. नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत सागरी जिल्ह्यांमध्ये मच्छिमारांसाठी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देणार. त्यासाठी ६१ कोटी २४ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी. राज्यातील वैद्यकीय शिक्षण प्रणाली, नर्सिंग सेवा आणि आरोग्य सेवा वितरण यंत्रणा अधिक सक्षम होणार. सशक्तीकरण प्रकल्प राबविण्यासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीकडून तीन हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्य उपलब्ध होणार. जिल्हा कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या आणखी सहा जिल्हयांचा समावेश. त्यामुळे सध्याच्या २७ आकांक्षित तालुक्यांसह नवीन १५० अशा एकूण १७७ तालुक्यांमध्ये संतुलित, सर्वांगिण व गतिमान विकासाच्या योजना राबविणार. वैद्यकीय व्यावसायिकांचे नियमन करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेशी निगडीत अधिनियमात सुधारणा करणार. उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार प्रशासन व संस्थात्मक रचनेत बदल होणार. परिषदेमधील सदस्यांची नियुक्ती निवडणुकीच्या ऐवजी शासनाकडून नामनिर्देशन पद्धतीने होणार आहे.

## कल्याणजवळ भीषण अपघातात ११ ठार

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याण-मुरबाड मार्गावरील पांजरा पुलावर सोमवारी (दि.१३) घडलेल्या भीषण अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाला. सिमेंट मिक्सर आणि ईको टॅक्सीची धडक झाल्यामुळे हा अपघात घडला.

हा अपघात इतका भयानक होता की संपूर्ण ईको टॅक्सीचा चेंदामेंदा होऊन त्यामधील प्रवाशांचा जागीच अंत झाला. सकाळी १०.४५ वाजता ही दुर्घटना घडली असून अपघाताने संपूर्ण जिल्हा हादरून गेला. मृतांमध्ये तीन महिला आणि आठ पुरुषांचा समावेश आहे. मुरबाड तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी भूषण घोरपडे यांच्यासह एकाच कुटुबातील तीन तरुणांचाही बळी गेल्याने या दुर्घटनेची



वेदना अधिक तीव्र झाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सोमवारी सकाळी प्रवासी घेऊन ईको गाडी कल्याणहून मुरबाडच्या दिशेने जात असताना रायतेजवळील पांजरा पुलावर समोरून येणाऱ्या सिमेंट मिक्सरला १०.४५ च्या सुमारास धडकली. घटनास्थळी पोलीस, रुग्णवाहिका आणि आपत्कालीन पथकांनी धाव घेतली. मृतदेह बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्रीचा वापर करावा लागला. ११ मृतदेह बाहेर काढल्यानंतर गोवेली ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. दरम्यान टिटवाळा पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

> *राज्याचा मोटार परिवहन विभाग अवैध प्रवासी वाहतुकीविरुद्ध सातत्याने कठोर कारवाई करत आहे, मात्र अशा दुर्घटना टाळण्यासाठी नागरिकांनीही जबाबदारीने वागणे अत्यावश्यक आहे. अवैध व क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेणाऱ्या वाहनांमधून प्रवास करणे टाळावे, तसेच सुरक्षित आणि नियमबद्ध प्रवासाला प्राधान्य द्यावे, ही नम्र विनंती.*
>
> **-प्रताप सरनाईक,** परिवहनमंत्री, महाराष्ट्र राज्य

## गायिका आशा भोसले अनंतात विलीन

### मुंबईत शासकीय इतमामात अखेरचा निरोप



**मुंबई : प्रतिनिधी**

संगीत विश्वातील एक तेजस्वी तारा निखळला आहे. भारतीय संगीत क्षेत्राला आपल्या आवाजाने समृद्ध करणाऱ्या गानसम्राज्ञी आशा भोसले आज कायमच्या आपल्यातून निघून गेल्या आहेत. सोमवारी, १३ एप्रिल रोजी मुंबईतील शिवाजी पार्क येथे शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी उपस्थित असलेले राजकीय नेते, सिने-कलाकार आणि हजारो चाहत्यांच्या उपस्थितीत वातावरणात प्रचंड शोकाकुल शांतता पसरली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी गायक शानने आपल्या सुरांनी आशाताईंना भावपूर्ण निरोप दिला, जो उपस्थितांच्या डोळ्यांत पाणी आणणारा होता.

आशा भोसले यांच्या निधनामुळे संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. भारतीय संगीतातील एक सुवर्णयुग आज खऱ्या अर्थाने संपले आहे. १२ एप्रिलला, रविवारी त्यांचे निधन झाल्यानंतर, आज सोमवारी (दि.१३) मुंबईतील शिवाजी पार्क येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## इर्शाळगडावर ट्रेकिंगला गेलेल्या तरुणाचा मृत्यू

**खोपोली, खालापूर, चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक हद्दीत असलेल्या इर्शाळगडावर ट्रेकिंगसाठी आलेल्या आकाश राजेंद्र वाघमोडे (वय २६,रा. तडाळी भिवंडी) या तरुणाचा मृतदेह सोमवारी दरीमध्ये आढळून आला. आकाश रविवारी एकटा ट्रेकिंग साठी त्याची दुचाकी घेऊन भिवंडीतून आला होता.

आकाशचा काही तपास लागत नसल्याची तक्रार खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांना प्राप्त झाल्यानंतर आकाशचा शोध घेण्यासाठी सोमवारी सकाळी हेल्प फाउंडेशन, इर्शाळवाडी ग्रामस्थ, पोलीस पाटील, होमगार्ड, चौक येथील सामाजिक कार्यकर्ते आणि पोलीस कर्मचारी यांची वेगवेगळी पथक तयार करून शोध मोहीम सुरू करण्यात आली. (पान २ वर..)

## खारघरमध्ये सायकल रॅली उत्साहात

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून युवकांना प्रोत्साहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मेरा युवा भारत तर्फे, भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित संडेज ऑन सायकल हा प्रेरणादायी उपक्रम खारघरमध्ये झाला. या कार्यक्रमाला भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थिती दर्शवून युवकांना प्रोत्साहन दिले.

खारघर येथील बी. डी. सोमाणी इंटरनॅशनल स्कूलपासून या सायकल रॅलीची सुरुवात करण्यात आली. या रॅलीत ३५०हून अधिक युवक-युवतींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. फिटनेस, पर्यावरण संवर्धन आणि



सामाजिक बांधिलकी यांचा संदेश देणारा हा उपक्रम युवकांमध्ये विशेष आकर्षण ठरला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फिट इंडिया आणि विकसित भारत या संकल्पनांना बळ देणारा हा उपक्रम असून, युवकांमध्ये आरोग्यदायी जीवनशैली, सायकलिंगची सवय आणि पर्यावरणाबाबतची जाणीव निर्माण करण्याचा उद्देश यामागे आहे. या वेळी खारघर भाजपचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक प्रवीण पाटील, माय भारतचे उपनिदेशक राहुल डोंगरे, जिल्हा युवा अधिकारी भूषण पाटील तसेच स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडियाचे सहाय्यक निदेशक अंकित पाटील उपस्थित होते.

## पत्रकारांसाठी लोणावळ्यात फाईव्ह स्टार दर्जाचे विश्रामधाम साकार


### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या लोणावळा येथील कै. दी. गो. तेंडुलकर स्मृती विश्रामधामाच्या विस्तारित व अत्याधुनिक कक्षाचे उद्घाटन जल्लोषात पार पडले. जलतरण तलावासह फाईव्ह स्टार दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या या विश्रामधामामुळे पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी एक उत्कृष्ट पर्यटन व विश्रांती केंद्र निर्माण झाले आहे. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या या सामाजिक कार्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भरघोस अशी ७० लाख रुपयांची देणगी दिली आहे. या विश्रामधामाच्या विस्तारित व अत्याधुनिक कक्षाचे उद्घाटन दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, इतक्या अल्प कालावधीत नूतनीकरणाचे काम पूर्ण करणे हे अत्यंत कठीण कार्य होते. मात्र संघाच्या कार्यकारिणीने ते शक्य करून दाखवले आहे, ही कौतुकास्पद बाब आहे. हे विश्रामधाम पत्रकारांसाठी (पान २ वर..)




# मृत गाढवांना उघड्यावर फेकून दिले

## ■ रायगड रस्त्यावर कोंझर घाटात दुर्गंधीचे साम्राज्य

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू आहेत. या विकास कामांमध्ये लागणारे बांधकाम साहित्य गाढवांच्या पाठी वरून गडावर वाहून नेले जात आहे. या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या या गाढवांचे मात्र या ठिकाणी प्रचंड हाल होत आहेत. ठेकेदारांकडून मृत गाढवांना उघड्यावर टाकून दिले जात आहे. महाड रायगड मार्गावर कोंझर घाटामध्ये जवळपास चार ते पाच गाढवांना उघड्यावर फेकून दिल्याने प्रचंड दुर्गंधी पसरली आहे.



ऐतिहासिक किल्ले रायगडच्या विकासासाठी करोडो रुपये मंजूर झाल्यानंतर गेली काही वर्षांपासून विविध विकास कामे सुरू आहेत. रायगड संवर्धना बरोबरच गडावर शिवप्रेमी आणि पर्यटकांसाठी केल्या जाणाऱ्या सोयी सुविधा तसेच संशोधनात्मक कामे सुरू आहेत या कामांसाठी लागणारे बांधकाम साहित्य गडावर नेणे मोठे जिकरीचे काम आहे. रोपवेच्या माध्यमातून काही साहित्य नेले जात असले तरी लागणारी वाळू, घडवले जाणारे दगड, आणि चुना आदी साहित्य गाढवांच्या पाठीवरून वाहून नेले जात आहे. किल्ले रायगडावर जाण्यासाठी सुमारे चौदाशे हून अधिक पायऱ्या आहेत खुबलढा बुरुज, महादरवाजा, या ठिकाणी उभा सरळ चढ आहे, अशा पायऱ्यांवर रायगड किल्ला सर करताना माणसाला दमछाक होते. अशा ठिकाणी या मुक्या प्राण्यांच्या पाठीवर शेकडो किलोचे ओझे लादून गडावर नेले जात आहे. या गाढवांचा सोशल मीडियावर देखील कौतुकाचा विषय व्हायरल झाला आहे. मात्र प्रत्यक्षात या गाढवांचे या ठिकाणी प्रचंड हाल होत असताना दिसत आहेत.

गड चढताना या गाढवांच्या तोंडाला फेस येतो तरी देखील न थांबता या गाढवांचा प्रवास दिवस – रात्र सुरूच आहे. ठेकेदार गाढवांच्या आरोग्या कडे लक्ष न देता केवळ बिल लाटण्यातच गुंग झाले आहेत. यामुळे गाढव मृत झाल्याच्या घटना यापूर्वी देखील अनेकदा घडल्या आहेत.

महाड रायगड रस्त्यावर जुन्या कोंझर घाटामध्ये संरक्षक भिंतीच्या जवळच दहा–पंधरा फुट दरी मध्ये मृत झालेली सुमारे पाच ते सहा गाढव निर्दयीपणे उघड्यावर टाकून दिलेली आहेत. आठवडाभरापूर्वी ही गाढव टाकून दिलेली असावी त्यामुळे या घाटामध्ये दुर्गंधी पसरली आहे.

एका स्थानिक रहिवाशाच्या हे निदर्शनास आल्यामुळे ही घटना समोर आली आहे. ज्या रायगडाच्या विकासामध्ये या गाढवांचे महत्त्वपूर्ण योगदान मानले जाते त्याच गाढवांचे ठेकेदारांकडून प्रचंड हाल केले जात आहेत. या गाढवांवर ना उपचार केले जात ना त्यांना योग्य आहार दिला जात. अशातच मृत पावल्या जाणाऱ्या गाढवांवर देखील सन्मानाने अंत्यसंस्कार केले जात नाही. हे या घटनेतून समोर आले आहे. मृत गाढवांना असे उघड्यावर टाकून दुर्गंधी पसरवणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

किल्ले रायगड परिसरामध्ये या गाढवांचे तळ आहेत ठेकेदारांनी आणलेली शेकडो गाढवे उघड्यावर बांधून ठेवली जातात तर त्यांना जाग्यावर आहार दिला जात नाही.

उलट गाव परिसरात उघड्या वर सोडून दिले जात आहे. गावभर फिरणाऱ्या या गाढवांची मल मूत्र परिसरात पसरले जात असल्याने यातून देखील मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरत आहे रायगडच्या विकासासाठी या गाढवांना आणण्याचे भावनिक उत्तर ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या लोकांकडून पुढे आणले जाते यामुळे स्थानिक ग्रामस्थदेखील बुयांचा मार सहन करत आहेत.

# तळोजा व नावडे येथील अनधिकृत आठवडा बाजारांवर महापालिकेची कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या दिलेल्या निर्देशानूसार तळोजा फेज–१, सेक्टर–१० येथे आज दिनांक १३ एप्रिल रोजी अनधिकृत बाजारांवर अतिक्रमण विभागाच्यावतीने कारवाई करण्यात आली. या ठिकाणी कारवाई नंतर पुन्हा बाजार भरला जाऊ नये यासाठी अतिक्रमण विभागाचे कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षक कर्मचारी तैनात करण्यात आले आहे.

तसेच उपविभाग नावडे अंतर्गत घोडगाव येथील अनधिकृत सोमवार बाजारांवर अतिक्रमण विभागाच्यावतीने कारवाई करण्यात आली. या ठिकाणी देखील पुन्हा बाजार भरला जाऊ नये यासाठी अतिक्रमण कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत.



उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या सुचनेनूसार फेरीवाले, हातगाड्यांवर तोडक कारवाई करून आठवडा बाजार बंद केले.

# रायगडावरील सीसीटीव्ही यंत्रणा बंद अवस्थेत ही गंभीर बाब –जिल्हाधिकारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडावरील सुरक्षेच्या मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. किल्लच्यावरील सीसीटीव्ही यंत्रणा बंद असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. सीसीटिव्ही यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असून सर्वच्या सर्व सिसीटीव्ही कॅमेरे नादुरुस्त झाले आहेत.

रायगड प्राधिकरण आणि पुरातत्व विभागाने गडावर विवीध ठिकाणी एकूण ५९ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. हे सर्व् कॅमेरे सध्या बंद अवस्थेत आहेत. पुर्वी गडावरील हत्तीखान्यात सीसीटीव्ही यंत्रणेचा कन्ट्रोल युनिट बसविण्यात आले होते. याच ठिकाणी पुरातत्व विभागाचे कार्यालयही होते. मात्र मागील काही वार्षात गडावर ठिकठिकाणी उत्खनन करण्यात आले. या उत्खननात सापडलेल्या वस्तूंचा संग्रह सध्या सग्रहालय स्वरूपात हत्तीखाना परिसरात करण्यात आला आहे. त्यामुळे येथील सीसीटीव्ही कंन्ट्रोल रुम दुसरीकडे नेण्याचा निर्णय घेण्यात आला मात्र नंतर हे काम पूर्णच केले गेले नसल्याची बाब सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात पार पडलेल्या शिवराज्याभिषेक दिन सोहळा तयारी बैठकीच्या निमित्ताने समोर आली.

या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आँचल दलाल, शिवराज्याभिषेक दिनोत्सव समितीच्या संयोगितराजे भोसले यांच्यासह विवीध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पुरात्तव विभाग आणि रायगड प्राधिकारण यांच्यात समन्वय नसल्याने सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याचे काम रखडले असल्याची गंभीर बाब उपस्थितांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर त्यानी तातडीने सर्व यंत्रणा कार्यान्वित करावी असे निर्देश दिले.

# पद असो की नसो समाजासाठी विकासात्मक कामे करत राहणार; कृषी सभापती वैकुंठ पाटील यांचे प्रतिपादन

**पेण : प्रतिनिधी**

हमरापूर विभागाच्या वतीने राजिप कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांच्यासह नवनिर्वाचित सभापती, सदस्य, नगरसेवकांचा सत्कार सोहळ्याचे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी आमदार रविशेठ पाटील, माजी खासदार तथा जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, माजी रायगड जिल्हा परिषद सदस्या कौसल्या पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा निलिमा पाटील यांच्या उपस्थितीत कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, पंचायत समिती सभापती स्मिता पाटील, नगराध्यक्षा प्रीतम पाटील, जि.प.सदस्य प्रभाकर म्हात्रे, जि.प. सदस्य जनार्दन भस्मा, महिला आघाडीच्या शर्मिला पाटील, पंचायत समिती सदस्य प्रदीप म्हात्रे, पंचायत समिती सदस्य विवेक म्हात्रे,पंचायत समिती सदस्य सुशांत खाकर, पंचायत समिती सदस्य मेघा मच्छिंद्र पाटील, पंचायत समिती सदस्य अस्मिता पाटील,नगरसेविका वसुधा पाटील, सुनीता जोशी, नगरसेवक निळकंठ म्हात्रे, मूर्तिकार संघटना अध्यक्ष अभय म्हात्रे यांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे परिसरातील ग्रामपंचायतीच्या वतीने देखील यावेळी सर्वांचा सरकार करण्यात आला.



कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांनी मागितले की, येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणार तसेच विभागात ४ ते ५ स्मार्ट स्कूलचे नियोजन तसेच पशुवैद्यकीय दवाखाना, जिल्हा परिषदेच्या माध्यातून शाळेला निधी उपलब्ध करून, अँब्युलन्स सेवा सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात आले असल्याचे सांगितले. तसेच क्रीडासंकुल, पाण्यासाठीची सुविधा उपलब्ध करण्यात येईल, पद असो की नसो समाजासाठी, आपल्या भागासाठी विकासात्मक कामे करत राहणार असल्याचे प्रतिपादन वैकुंठ पाटील यांनी केले

माजी खासदार धैर्यशील पाटील यांनी जनतेचे काम करत राहण्याचे आवाहन जिप सभापती वैकुंठ पाटील व पं.स. सभापती स्मिता पाटील तसेच सर्व उपस्थित सदस्य, नगरसेवक यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

आमदार रविशेठ पाटील यांनी हमरापूर भागाने वैकुंठ पाटील व स्मिता पाटील यांना भरघोस मतांनी निवडून दिले हे आपलं भाग्य आहे.तालुक्याचे चित्र आता बदलले आहे. आमदार, खासदार, नगरसेवक,सभापती आपल्याकडे आहे आता ग्रामपंचायती ही आपल्याकडे आल्या पाहिजे, सर्वांनी एकत्र येत आता काम केले पाहिजे असे आवाहन केले.

स्मिता पाटील यांनी सर्वांचे आभार मानून विकास कामासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी नितीन मोकल, पेण मंडळ अध्यक्ष विजय पाटील यांच्यासह हमरापूर विभागातील अनेक भाजप कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# मोहोपाड्यात धर्मरक्षेसाठी सकल हिंदू संमेलन

**रसायनी , मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील जनता विद्यालयाच्या प्रांगणात सकल हिंदू संमेलन संध्याकाळी पार पडले.प्रमुख पाहुणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह कृष्णगोपालजी होते. स्वागताध्यक्ष ह.भ.प. वामन महाराज भोईर यांच्याहस्ते प्रमुख पाहुणे व मान्यवरांना तुळशीचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले.

व्यासपीठावर प्रमुख पाहुणे कृष्णगोपालजी, ह.भ.प.वामन महाराज भोईर,ह.भ.प.सच्चिदानंद कांबेकर,देवेंद्र भोजने,डॉ.सागर कांबळे,रजनी गायकवाड,ललिता दळवी,ताई पवार उपस्थित होते. तर कार्यक्रमासाठी तालुका पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, सरपंच उमाताई मुंढे,जि.प.सदस्या नेहा पारंगे आणि परिसरातील शेकडो हिंदू समाज बांधवांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिपप्रज्वलन करुन स्व.आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



लोधिवली येथील शिवगर्जना शस्त्रपथकाच्या मुला–मुलींनी दांड–पट्टा,लाठी–काठी,काकडा,ढाल–तलवार याची प्रात्यक्षिके दाखवली.

प्रमुख पाहुणे कृष्णगोपालजी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, हिंदू अत्यंत उदार व धार्मिक आहे. पूर्वी तो संघटित नसल्याने देशावर परकीय आक्रमणे झाली. त्यातूनही तो सावरला.हिंदू संघटित होण्यासाठी डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी सन १९२५ मध्ये नागपूरला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली.त्याला नुकतीच १०० वर्षे पूर्ण झाली. हिंदूंनी हिंदूंची सुरक्षा केली पाहिजे पर्यावरण, तरूणाची व्यसनाधीनता यावर खूप कार्य करावे लागेल हे सांगितले. शेवटी संकल्प करण्यात आला.

# आरोग्यविषयक उपक्रम राबवून वैद्यकीय महाविद्यालयातर्फे महामानवांना अभिवादन

**अलिबाग : प्रतिनिधी**

विविध सामजिक व आरोग्यविषयक उपक्रम राबवून रायगड जिल्हा क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महामानवांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातर्फे महामानवांना अभिवादन करण्यात आले. शनिवारी (दि.१३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग येथे १८ तासांच्या अध्ययन अध्ययन उपक्रम राबविण्यात आला.



महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती उत्सवाचे औचित्य साधून, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग येथे विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्टुडंट कौन्सिल कमिटी यांच्या वतीने हे उपक्रम राबवण्यात आले.

१० एप्रिल २०२६ रोजी जिल्हा परिषद शाळा माणी आणि भुते येथे आरोग्य जनजागृती अभियान राबवण्यात आले. या अभियानांतर्गत शालेय विद्यार्थी दैनंदिन जीवनातील आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने वैयक्तिक , मासिक पाळीतील आरोग्य व्यवस्थापन , आणि रक्तक्षय निर्मूलन यांसारख्या संवेदनशील विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच 'हिपॅटायटीस बी' लसीकरणाची गरज आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत तज्ज्ञांनी सखोल माहिती ज्ञात आली.

संयुक्त जयंती महोत्सवाचा भाग म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीदिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) थळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्या वतीने हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या स्टुडंट कौन्सिल या सामाजिक उपक्रमाचे यशस्वी नियोजन केले.सदर कार्यक्रमासाठी आरसीएफचे कार्यकारी संचालक म्हणून नितीन हिरडे हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. सुधाकर बांटेवाड व डॉ. विशाल उबाले, आरसीएफ थळ युनिटचे रमेश कवळे व रक्तपेढीचे डॉ. दीपक गोसावी उपस्थित होते.

### १८ तासांचा अध्ययन उपक्रम

१३ एप्रिल रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग येथे १८ तासांच्या अध्ययन उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकी १० मिनिटांची ध्यान सत्रे आयोजित करण्यात आली. ही सत्रे बनसोडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेज कॅम्पसमध्ये शांत व सकारात्मक वातावरणात पार पडली.

पान १ वरुन

## पत्रकारांसाठी लोणावळ्यात फाईव्ह स्टार दर्जाचे विश्रामधाम साकार

तसेच त्यांच्या कुटुंबीयांसाठी एक आदर्श पर्यटन पर्याय ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमास काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत, माजी नगराध्यक्ष श्रीधर पुजारी, लोणावळा नगर परिषदेचे मुख्याधिकारी अशोक साबळे, संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, राजेंद्र हुंजे, खजिनदार जगदीश भोवड तसेच विश्वस्त राही भिडे, दीपक म्हात्रे, अजय वैद्य आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी सांगितले की, संघाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त हे अत्याधुनिक विश्रामधाम पूर्ण करण्याचा योग साधला गेला आहे. फाईव्हस्टार दर्जाच्या सुविधा देतानाच या वास्तूचे सांस्कृतिक मूल्य जपण्याचे मोठे आव्हान कार्यकारिणीने यशस्वीपणे पार पाडले आहे. कामगार नेते महेंद्र घरत यांनी विक्रमी वेळेत पूर्ण झालेल्या या प्रकल्पाबद्दल कार्यकारिणीचे कौतुक केले. मुख्याधिकारी अशोक साबळे यांनी पत्रकारांच्या कुटुंबीयांसाठी हे ठिकाण उत्तम पर्यटन पर्याय ठरेल, असे मत व्यक्त केले. तर माजी नगराध्यक्ष श्रीधर पुजारी यांनी या प्रकल्पासाठी लोणावळा नगर परिषदेकडून संपूर्ण सहकार्य उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. सुमारे ५० वर्षांपूर्वी उभारण्यात आलेले हे विश्रामधाम कालांतराने जीर्ण झाले होते.

पत्रकारांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन यामध्ये चार अतिरिक्त बेडरूम, अत्याधुनिक सुविधा आणि स्विमिंग पूलची उभारणी करण्यात आली आहे. पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना या सर्व सुविधा अल्प दरात उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती कार्यवाह शैलेंद्र शिर्के यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र हुंजे यांनी केले, प्रास्ताविक शैलेंद्र शिर्के यांनी सादर केले, तर उपाध्यक्षा स्वाती घोसाळकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## इर्शाळगडावर ट्रेकिंगला गेलेल्या तरुणाचा मृत्यू

जवळपास पाच तासाच्या शोध मोहिमेनंतर आकाशचा मृतदेह दरीमध्ये आढळून आला. हा ट्रेकर उंचावरून पडल्याने त्याचे शरीर छिन्नविछिन्न झाले असल्याने बॉडी खाली आणण्यासाठी खुपचं प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली.

दरम्यान, पाय घसरून आकाश दरीमध्ये पडल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत असून या अगोदरदेखील अशा प्रकारे ट्रेकर्सचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे सोलो ट्रेकिंग धोकादायक असल्याने टाळावे असे हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांनी सांगितले.

## निवडक

### भरधाव दुचाकीचा अपघात

**पनवेल :** भरधाव दुचाकी चालवून ती अनियंत्रित झाल्याने अपघात होऊन दुचाकीवरील गणेश परशुराम राठोड वावेघर) हा जखमी झाला. या अपघातप्रकरणी दुचाकी चालविणारा चालक प्रशांत हडगिलकर (रा. गुळसुंदे) यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गणेश राठोड आणि प्रशांत हडगिलकर हे दोघेही दुचाकीवरून कसळखंड येथील ढाब्यावर जेवण करण्यासाठी वावेघर येथून सावळा मार्गे कसळखंड येथे जात होते. प्रशांतने भरधाव दुचाकी चालविल्याने अपघात झाला होता.

### किरकोळ वादातून मारहाण

**पनवेल :** आठ ते दहा व्यक्तींनी २६ वर्षीय तरुणाला लोखंडी सळई आणि दगडाने मारहाण केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारदार रिहान ओसामा खान हा बांद्रा येथे राहत असून तो रॅपिडो कार चालवतो. पनवेल येथे भाडे आकारण्यावरून वाद झाल्याने आरोपींनी रिहान याला लोखंडी सळई आणि दगडाने मारहाण केली.

### मारहाण करून मागितली खंडणी

**पनवेल :** दारूच्या दुकानात चार व्यक्तींनी हातोडी आणि लाथाबुयांनी मारहाण करत ४० हजारांची खंडणी मागितली. या प्रकरणी चौघांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राज रजनी हा तळोजा फेज टू येथे राहत असून, त्याचे तळोजा येथे दारूचे दुकान आहे. महिनाभरापूर्वी या ठिकाणी आलेल्या दोघांनी त्यांच्याकडे पैसे मागितले आणि मारण्याची धमकी दिली. राज यांनी त्यांना पैसे दिले नाही. त्यानंतर दोघांनी दारू खरेदी केली. मात्र, पैसे देण्यास नकार दिला. तसेच महिन्याला ४० हजार रुपये देण्याची मागणी केली. राज यांनी नकार दिला असता त्याला धमकी देत मारहाण केली.

## पनवेलच्या निसर्गसौंदर्यावर घाला!

# 'ऑक्सिपार्क'मध्ये विनापरवाना वृक्षछाटणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहराच्या सुशोभीकरणात भर घालणाऱ्या 'ऑक्सिपार्क' या सार्वजनिक उद्यानांमधील झाडांवर आता जाहिरातदारांनी डल्ला मारण्यास सुरुवात केली आहे. तक्का पेट्रोल पंपासमोरील सिग्नलजवळ असलेल्या उद्यानातील पाच झाडांची अनधिकृतपणे छाटणी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार सोमवारी (दि.१३) उघडकीस आला. जाहिरातीचे होर्डिंग प्रवाशांना स्पष्ट दिसावे, या स्वार्थापोटी ही झाडे छाटली गेल्याचा संशय तक्रारदाराने व्यक्त केला असून, या प्रकरणी महापालिकेने तातडीने पंचनामा केला आहे.



### होर्डिंग स्पष्ट दिसण्यासाठी झाडे छाटल्याचा संशय

या ऑक्सिपार्कमुळे नागरिकांना एक सामुदायिक, शांत आणि नैसर्गिक वातावरण मिळाले होते. तसेच, पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत प्रभावी ठरला होता. उड्डाणपुलाजवळ वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या या उद्यानामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांचे लक्ष वेधले जात होते आणि शहराच्या सकारात्मक बदलाचे प्रतीक म्हणून ते ओळखले जाऊ लागले, मात्र काही अज्ञात व्यक्तींनी या उद्यानातील झाडांची तोड करून पर्यावरणाचे मोठे नुकसान केले आहे. ही घटना अत्यंत निंदनीय असून समाजहिताला बाधा आणणारी आहे. अशा कृत्यांमुळे केवळ पर्यावरणाचाच नव्हे तर सामाजिक उपक्रमांवरही परिणाम होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.यामुळे निसर्गप्रेमी नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सोमवार, १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.४० च्या सुमारास तक्का पेट्रोल पंपासमोरील उद्यानात वृक्षछाटणी झाल्याचे स्थानिक नागरिक आणि तक्रारदार रोहित आटवणे यांच्या निर्दशनास आले. या उद्यानातील चार 'तबुबिया' आणि एक 'सप्तपर्णी' अशा एकूण पाच झाडांच्या फांद्या आणि शेंडे मोठ्या प्रमाणात निर्दयीपणे छाटण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, या झाडांच्या अगदी मागे एक मोठे जाहिरातीचे होर्डिंग आहे. झाडांच्या वाढलेल्या फांद्यांमुळे हे होर्डिंग झाकले जात होते. आपली जाहिरात लोकांच्या नजरेस पडावी यासाठी संबंधित होर्डिंग मालकानेच ही वृक्षछाटणी केली असावी, असा प्राथमिक संशय तक्रारदाराने अर्जात नमूद केला आहे.

घटनेची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. सकाळी १०.५५ वाजता प्र. अधिक्षक संदीप पवार, विवेक दळे, प्रविण भोईर आणि नितीन बाबुळे यांनी तक्रारदार रोहित आटवणे व साक्षीदार तुषार कापरे यांच्या उपस्थितीत या घटनेचा सविस्तर पंचनामा केला. भररस्त्यात आणि वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या बागेतील झाडांची अशा प्रकारे छाटणी झाल्याने पर्यावरण प्रेमींकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आता या प्रकरणी दोषी असलेल्या होर्डिंग मालकावर महापालिका काय कठोर कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## दुचाकीस्वाराचा बल्करच्या धडकेत मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली परिसरात भरधाव बल्करच्या धडकेत एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या अपघातात दुचाकीवर पाठीमागे बसलेला तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कळंबोली पोलिसांनी बल्करचालकाविरोधात गुन्हा दाखल आहे.

कमलेश सूरज यादव (वय २६) याचा या अपघातात मृत्यू झाला तर शैलेश सहानी (वय २२) हा जखमी झाला आहे. हे दोघेही कळंबोलीत राहण्यास असून कळंबोली सर्कल येथील ए. आर. के. टायरसमोरून सिमेंट कंपनीच्या मुख्य रस्त्यावरून प्रवास करीत होते. याच वेळी भरधाव वेगाने आलेल्या बल्करचालकाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीचालक कमलेश गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला, तर शैलेश गंभीर जखमी झाला आहे. दरम्यान, शहरात अपघातांच्या संख्येत वाढ होत आहे. वाहतूकीचे नियम पाळावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांसाठी रक्तदान शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

श्री प्रल्हादराव झुलेलाल ट्रस्ट, आम्ही रक्तदाते पनवेलचे ,पुज्य सिंधी पंचायत, पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्था, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच पनवेल -नवी मुंबई पत्रकार संघ, विश्व सिंधी सेवा संगम आणि एमजीएम रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने थॅलेसेमिया ग्रस्त रुग्णांच्या मदतीकरिता रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.



उद्घाटन महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी नगरसेवक मनोज भुजबळ यांनी सदर रक्तदान शिबिराला भेट दिली व शुभेच्छा दिल्या. शिबिराकरिता मनोहर सचदेव, अमोल साखरे, पांडुरंग हुमणे, किसन रौंदळ, मुरलीधर ढाके, भूषण चोनकर, संगीता साखरे, उज्वला व सचिन भिसे आदींनी मेहनत घेतली.

## गव्हाण विद्यालयातील प्रणव राणेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर प्रबोधिनी अंतर्गत रयत प्रज्ञाशोध परीक्षेत (आर.टी.एस) यशस्वी होत रयत माऊली सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शिष्यवृत्ती धारक ठरल्याबद्दल गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी प्रणव प्रशांत राणे ह्याने



मातोश्री प्रांजल प्रशांत राणे व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सोमवारी सदिच्छा भेट घेतली असता त्यांनी त्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

या विद्यार्थ्यास पुढील आठवी व नववी अशा सलग दोन वर्षात प्रत्येकी दोन हजार याप्रमाणे शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे. प्रणव राणे याच्या बौद्धिक क्षमतेची लक्षवेधी चुणूक या शिष्यवृत्ती परीक्षेतून अधोरेखित झाली असून भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षेत उज्वल यशासाठी शुभेच्छा देवून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले.

यावेळी प्रणव सोबत विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील,संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर,रयत प्रज्ञाशोध परीक्षा विभागप्रमुख प्रतिज्ञा घरत, ज्युनिअर कॉलेजचे ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र चौधरी व प्रांजल राणे आदी उपस्थित होते.

## उरणमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव

**उरण : वार्ताहर**

बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र.८४३ वतीने वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त १३ ते १९ एप्रिलदरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आले आहे.

यात १३ रोजी बुगी -बुगी कार्यक्रम, १४ रोजी सकाळी ९.३० वाजता सामुहिक बुद्ध पूजा, ध्वजारोहण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक, १५ रोजी महिला मंडळ संसृतिक कार्यक्रम व खेळ, १६ रोजी लेझीम संसृतिक कार्यक्रम व बक्षीस समारंभ, १७ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत नेत्र तपासणी शिबीर, ऑर्केस्ट्रा, १८ रोजी धार्मिक प्रवचन, १९ रोजी सायंकाळी लहान मुलांचे सत्कार समारंभ आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आले आहे.

## प्रियांका डोकेंना पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रियांका डोके-मंडलिक यांना दिल्ली येथे झालेल्या इंटरनॅशनल अचीवर अवॉर्ड कार्यक्रमामध्ये अकॅडमिक लीडरशिप एक्सलेंस अवॉर्ड आणि सोशल जस्टीस चॅम्पियन या दोन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.



अॅड. प्रोफेसर प्रियांका डोके-मंडलिक (एचओडी ऑफ एलएलएम डिपार्टमेंट, डॉ.डी वाय पाटील कॉलेज ऑफ लॉ, नेरूळ) यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने दिले असून नागरिकांना त्यांच्या मानवी अधिकारांविषयी जागृत केले आहे तसेच सायबर क्राईम विषयी माहिती देऊन जनजागृती केली आहे. तसेच त्यांनी वकिली आणि प्रोफेसर या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात दोन अवॉर्ड्सने सन्मानित करण्यात आले.

## नीलम विभुते यांची शोकसभा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा महामार्गावरची ती पहाट आजही अनेकांच्या मनात जखम करून गेली आहे. सुकेळी खिंडीतील त्या भीषण अपघाताने एका आनंदी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आणि पनवेल शहराला शोकसागरात बुडवून टाकले. त्या काळजाचा ठोका चुकवणाऱ्या घटनेत आपला जीव गमावलेल्या नीलम वैभव विभुते यांच्या स्मरणार्थ रविवारी पनवेल शहरातील विरूपाक्ष हॉलमध्ये शोकसभा आयोजित करण्यात आली.

वातावरणात एकच शांतता डोळ्यांत अश्रू आणि मनात त्या दुर्दैवी घटनेची वेदना अशा भावनिक वातावरणात उपस्थितांनी नीलम विभुते यांना श्रद्धांजली अर्पण केली. या शोकसभेला आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक सुमीत झुंजारराव, स्वप्नील ठाकूर यांच्यासह त्यांचे मित्रपरिवार, नातेवाईक



आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दुःखाची छाया होती आणि शब्दांपेक्षा अश्रूंनीच भावना व्यक्त होत होत्या.

यावेळी मान्यवरांनी नीलम विभुते यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. एक आनंदाचा प्रवास दुःखद शेवटाकडे वळला आणि मागे राहिल्या त्या फक्त आठवणी नीलम विभुते यांच्या जाण्याने पनवेल शहराने एक हळवं, प्रेमळ व्यक्तिमत्त्व गमावलं असून, ही पोकळी कधीही भरून न निघणारी आहे.

## खारघरमध्ये खांदेश स्नेहमेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदेश स्नेहमेळावा समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला वार्षिक खांदेश स्नेहमेळावा रविवारी खारघर येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. या कार्यक्रमाला राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन, आमदार प्रशांत ठाकूर तसेच नगरसेवक मधू पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक वाद्यांच्या गजरात झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजनात्मक उपक्रम आणि स्पर्धांमुळे उपस्थितांना खांदेशी संस्कृतीचा अनुभव घेता आला. विशेषतः पारंपरिक कला सादरीकरणांना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी खांदेशी बांधवांनी एकत्र येऊन परंपरा जपण्याचे केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात विविध स्पर्धा, स्नेहभोजन आणि पारंपरिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहिल्याने संपूर्ण वातावरण उत्साहपूर्ण झाले होते.

खांदेश स्नेहमेळावा समितीने उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले.



## कीर्तन प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विरुपाक्ष मंदिर ट्रस्ट, पनवेल यांच्या वतीने आयोजित तीन दिवसीय नारदीय कीर्तन प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ झाला. येथील विरुपाक्ष मंदिर सभागृहाच्या कार्यालयात हे शिबीर संपन्न होत आहे. या उद्घाटन सोहळ्याला ट्रस्टचे अध्यक्ष नंदू पटवर्धन, विश्वस्त संदिप लोंढे, महेंद्र गोडबोले, राजन पेठे, यांच्यासह ह. भ. प. श्रीराम चितळे, चारुदत्त जोशी व ह. भ. प. नंदकुमार कर्वे उपस्थित होते.




या शिबिरामधे ज्येष्ठ कीर्तनकार नंदकुमार कर्वे मार्गदर्शन करणार असून त्यामधे विविध सत्रांमधे नामांकित कीर्तनकारांची विविध विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्याने, चर्चासत्रे, आणि युवा कीर्तनकार सायली मुळ्ये व दर्शन वझे यांची कीर्तने असे या शिबिराचे स्वरूप असून राज्यभरातून अनेक प्रशिक्षणार्थी उपस्थित झालेले आहेत.

> **कीर्तनकारांनी कीर्तन प्रत्यक्षात आचरणात आणावे तसेच आचारनिष्ठ व निरपेक्ष वृत्तीने आध्यात्म आणि हरिभक्तीचा प्रसार करणारे कीर्तनकार निर्माण व्हावे यासाठी विरुपाक्ष मंदिर ट्रस्टच्या वतीने हा उपक्रम आयोजित केला आहे.**
>
> **-हभप नंदकुमार कर्वे, प्रमुख मार्गदर्शक**

## पनवेलमध्ये सकल हिंदू संमेलन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

धर्मो रक्षति रक्षितः या संदेशाला अधोरेखित करत पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघ हॉलमध्ये रविवारी सकल हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. हिंदू समाजात एकता वाढविणे आणि देव, धर्म व देशभक्तीची भावना दृढ करणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश होता.

या संमेलनात भारतीय संस्कृती व सनातन धर्म यावर आधारित उद्बोधनपर भाषणे झाली. तसेच पोवाडा, भारुड, अभंग आणि संपूर्ण वंदे मातरम या नृत्याविष्कारांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिकांनी पारंपरिक वेशात हजेरी लावून वातावरण भक्तिमय व उत्साही केले.



यावेळी महापौर नितीन पाटील, माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहराध्यक्ष तथा नगरसेवक सुमीत झुंजारराव, नगरसेविका रुचिता लोंढे आणि नगरसेविका प्रिती जॉंज आदी मान्यवर उपस्थित होते.

संमेलनात श्रीराम पुरोहित (रायगड भूषण, कीर्तनकार), रघुजीराजे आंग्रे (रायगड विभाग संघचालक) आणि सुनिता खरे (संस्कार भारती, कोकण प्रांत) यांनी प्रभावी उद्बोधन केले.

कार्यक्रमाचे आयोजन हिंदू संमेलन समितीचे अध्यक्ष नंदकुमार कर्वे, उपाध्यक्ष जयवंत गुर्जर व सुनिता खरे, सचिव गुरुनाथ (संदीप) लोंढे, खजिनदार प्रकाश चांदवडकर, सहसचिव प्रथमेश सोमण, सहखजिनदार अमोल शेट्ये तसेच सर्व सदस्यांनी केले.

या संमेलनातून जात, पंथ व भाषाभेद विसरून हिंदू समाजाने एकत्र येण्याचा संदेश देण्यात आला.

## संपादकीय

# देशाच्या भविष्याचा दीपस्तंभ!

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या केवळ नावाचा गौरव करून नव्हे, तर त्यांच्या विचारांचा वारसा जपणे आणि त्यांनी मांडलेल्या मूल्यांची निष्ठेने अंमलबजावणी करणे हीच समाजाची सरकारकडून अपेक्षा असते. मोदी सरकार या कसोटीत उत्तीर्ण होत आहे, ही सामाजिकदृष्ट्या समाधानाची बाब आहे.

**जाणिवा जागृत असलेला समाज ही राष्ट्राची शक्ती असते. पण असा समाज संघटित असणे आवश्यक असते. जाणिवा जाग्या असलेला समाज संघटित झाला, तर राष्ट्राचे बळ अधिक वाढते. म्हणूनच महामानव भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजास संघटित होण्याचा मंत्र दिला. केवळ संख्यात्मकदृष्ट्या संघटित होणे महत्वाचे नाही, तर सुशिक्षित समाजाने संघटित होणे महत्वाचे. सुशिक्षित समाज संघटित झाला, की हक्कांच्या जाणिवा प्रगल्भ होतात, आणि संघर्षास धार येते. म्हणून, शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ही भूमिका घेऊन समाजसंघटनाचे महान कार्य बाबासाहेबांनी केले. समाजपरिवर्तनाचा मार्ग शिक्षणातून जातो, हा या विचाराचा गाभा म्हणावा लागेल. संघर्ष करावयाचा असेल, हक्कांच्या जाणीवा जाग्या ठेवायच्या असतील, तर भवतालाचे भान असायलाच हवे. हे भान शिक्षणातूनच येते. शिक्षणाविना अस्तित्व सिद्ध करण्याची धमक निर्माण होत नाही. त्यांच्या मनात एकटे पडण्याची भीती घर करते. शिक्षणामुळे ही भीती दूर होतेच, पण चुकीच्या निर्णयाविरोधात संघर्ष करण्याची धमकही निर्माण होते. भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे सुधारक समाजाच्या सातत्यपूर्ण वाटचालीत भविष्याचा मार्ग दाखविणारे नंदादीप असतात. त्यामुळे या महामानवाने दिलेल्या जगण्याच्या आणि स्वयंविकासाच्या मंत्राचा उच्चार करण्याकरिता हीच योग्य वेळ आहे. केवळ अक्षरे शिकणे म्हणजे शिक्षण नव्हे. मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षण ही समाजाची खरी गरज असते. शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर अशी शिक्षणपद्धती असली पाहिजे, असा बाबासाहेबांचा आग्रह होता. प्रगतीपासून वंचित असल्याने दुसऱ्याचे गुलाम होणे भाग पडणाऱ्या वर्गाच्या मानसिकतेतील न्यूनगंड नाहीसा करणे हे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. मोदी सरकारच्या शिक्षण धोरणाचा पाया बाबासाहेबांच्या याच विचारांवर बेतला गेला आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय हा भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. केंद्रातील आणि विविध राज्यांतील भाजपप्रणित सरकारांची नाळ या विचारांशी जोडलेली आहे. त्यामुळेच, समता, स्वातंत्र्य बंधुता आणि सामाजिक न्याय या केवळ घोषणा नाहीत, तर त्याचे प्रतिबिंब धोरण आणि अंमलबजावणीतही दिसावे यासाठी सरकारी स्तरावर सुरू असलेल्या प्रयत्नांची फळे आता दिसू लागली आहेत. भारतीय संविधान ही केवळ हातात धरून उंचावण्याची एक पुस्तिका नाही. या संविधानास एक पावित्र्य आहे, आणि लोकशाहीचा पवित्र दस्तावेज म्हणून प्रतिष्ठाही आहे. हे पावित्र्य आणि प्रतिष्ठा मनामनात रुजविण्यासाठी मोदी सरकारने 26 नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. डॉ. आंबेडकर यांनी आर्थिक स्वाववंलनास दिलेले महत्व अधोरेखित करून स्टँड अप इंडिया, मुद्रा कर्ज योजना आदींच्या माध्यमातून मोदी सरकारने घेतलेला समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणाचा वसा हादेखील बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा आहे. वंचित घटकांना कर्ज आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न, डिजिटल व्यवहारांना चालना या केवळ तांत्रिक सुधारणा नाहीत, तर वैचारिक आणि प्रतीकात्मकदृष्ट्या सामाजिक सुधारणांचे एक महत्वाचे पाऊल ठरते. कारण या योजना बाबासाहेबांच्या विचारांशी सुसंगत व प्रामाणिक आहेत. म्हणूनच, बाबासाहेब आंबेडकर ही केवळ व्यक्ती नव्हे, तर राष्ट्राच्या भविष्यास दिशा देणारा कालातीत विचार आहे.**

# डॉ. बाबासाहेबांचे संविधान म्हणजे एकसंघ भारताची पोलादी चौकट



१४ एप्रिल हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील प्रेरणादायी पर्व आहे. या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशभर मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. 'विश्वरत्न', 'भारतरत्न', 'घटनाकार" आणि 'भारत भाग्यविधाता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या भारताला एकसंघ राष्ट्र म्हणून बांधून ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले.त्यामुळेच त्यांच्या जयंती दिनी संपूर्ण देशात त्यांना आदरांजली व्यक्त केली जाते. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतची जनता आजच्या दिवशी महामानवापुढे नतमस्तक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले संविधान व त्यावर आधारित लोकशाही जोपर्यंत भारतात आहे, एकसंघ भारतासाठी कायद्याची पोलादी चौकट कायम आहे. त्यांना आदरांजली व्यक्त करताना संविधानाच्या स्वरुपात बाबासाहेबांनी दिलेल्या समानता, न्याय आणि बंधुतेच्या धाग्यात सर्व भारतीयांना गुंफण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका स्पष्ट होती. संविधान सभेत बोलताना ते म्हणाले होते, "राष्ट्र प्रथम, समाज नंतर आणि व्यक्ती त्यानंतर." स्वतः आयुष्यभर सामाजिक अन्याय सहन करूनही त्यांनी कधीही कोणाबद्दल सूडाची भावना बाळगली नाही. उलट, त्यांनी अशी राज्यघटना निर्माण केली ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळेल.

आचार्य प्र. के. अत्रे यांनी बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर लिहिलेल्या आपल्या आदरांजलीत आंबेडकरांना "जुलूमाविरुद्‌ध उगारलेली वज्राची मुठ" असे संबोधले आहे. ही उपमा त्यांच्या संघर्षशील वृत्तीचे आणि अन्यायाविरुद्‌धच्या लढ्याचे अचूक चित्रण करते.

स्वातंत्र्यानंतर भारत एकसंघ राहील का? याबाबत अनेक पाश्चिमात्य नेत्यांना शंका होती. विविध धर्म, भाषा, जाती यामुळे भारताचे विभाजन होईल, असे भाकीत केले जात होते. विस्टन चर्चिल यांसारख्या नेत्यांनी भारताच्या एकात्मतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. भारतातील विविधता, विविध धर्मांचे लोक, धर्मावरून झालेली विभागणी हे मोठे उदाहरण पुढे होते. त्यामुळे भारताचे भविष्य अंधकारमय वाटणे तत्कालीन परिस्थितीला धरून होते. मात्र, बाबासाहेबांनी अभ्यासाअंती यावर रामबाण उपाय शोधून काढला. ते म्हणजे संविधान, आपली राज्यघटना. संविधान सभेपुढील भाषणात ते म्हणाले होते, स्वातंत्र्य आणि समानता ही मूल्ये बंधूतेशिवाय टिकू शकत नाही. राजकीय लोकशाही यशस्वी तेव्हाच होईल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल. त्यामुळे आजचा दिवस सामाजिक लोकशाही बळकट करण्याचा देखील आहे.

आपण बघतो, भाषा, प्रांत, जाती, अस्मिता यावरून देशात आजही अनेक आंदोलने सुरू असतात, विविध संघटना आणि राजकीय पक्ष आपापल्या भूमिका मांडत असतात. संविधानाचे वैशिष्ट्य म्हणजे संविधान भाषा, प्रांत, जाती, अस्मिता यांचे अस्तित्व मान्य करते. मात्र, सोबतच राष्ट्रापुढे सर्व बाबी गौण ठरवते. विधिमंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका, माध्यमे अशा सर्व स्तंभांना त्यांनी परस्परपूरक उभे केले आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटनेला पुढे ठेऊनच सर्व घटकांना आपली वाटचाल करावी लागते. "भारतीय संसद,न्यायपालिका आणि कार्यपालिका या एकमेकांवर नियंत्रण व संतुलन ठेवतात. कार्यपालिका राज्यघटनेनुसार प्रशासन करते, आणि या सर्वांवर माध्यमे व जनतेचे लक्ष राहते.

शोषित, वंचित, गरीब मागास सर्व घटकांना समतोल विकासाची संधी मिळणे व त्यांच्या न्याय्य हक्काचे रक्षण होणे किती आवश्यक आहे हे बाबासाहेबांना माहिती होते. त्यामुळेच त्यांनी घटनेमध्ये मूलभूत अधिकार सुस्पष्टपणे अंतर्भूत केले. या अधिकारामुळे कायद्यापुढे सर्व समान आणि सर्वांना कायद्याचे संरक्षण मिळाले आहे.

बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व नागरिक कायद्यापुढे समान असतील, जात, धर्म, वंश, लिंग किंवा जन्मस्थानावरून भेदभावास मनाई, अस्पृश्यता अमान्य, आणि नियुक्तीची समान संधी, तसेच देशाप्रतीची बांधिलकी या बाबी नमूद केल्या. एका सामान्य स्त्री-पुरुषाला देशाचा प्रधानमंत्री, राष्ट्रपती बनण्याचा अधिकार देतानाच भेदभावाला त्यांनी या समानतेच्या अधिकाराने कायदेशीर बंधन घातले ज्यांना हजारो वर्ष शिक्षण, वाणी, अधिकार आणि सहभागांपासून जाती धर्माच्या आधारावर संधी नाकारली गेली. त्या सर्वांना स्वतंत्र भारतात अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्याचे कार्य बाबासाहेबांमुळे झाले. प्रत्येक भारतीयाला भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देते. भारताचा नागरिक कोणत्याही राज्यामध्ये मुक्त संचार करू शकतो. भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा अधिकार त्याला मिळालेला आहे. जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण, शिक्षणाचा हक्क, न्यायालयात दाद मागण्याचा हक्क, विनाकारण स्थानबद्‌ध न करण्याचा हक्क अशा अनेक मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे.

हजारो वर्षाची वेठबिगारी, सालदारी, बिनपगारी शोषणाला बळी पडलेल्या शोषितांना थेट घटनेच्या माध्यमातूनच बाबासाहेबांनी न्याय दिला. या कायद्यामुळे स्वतंत्र भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात माणसांना गुलाम ठेवणे, वेठबिगारी सारखे काम करुन घेणे, बिनपगारी सालदारी करणे, सक्तीने सेवा करायला सांगणे, धर्म, वंश, जात यावरुन काम करुन घेणे, बळजबरीची मजुरी करुन घेणे, १४ वर्षाखालील कोणत्याही बालकाकडून काम करुन घेणे, अर्थात बालमजुरीवर बंदी घालण्यात आली. सोबतच सर्वांना आपापला धर्म पाळण्याची मुभा देण्यात आली. प्रत्येक धर्माला धार्मिक विधी, धार्मिक व्यवहाराची व्यवस्था, सांस्कृतिक शैक्षणिक हक्क प्रदान करण्यात आले. धार्मिक शिक्षण, धार्मिक उपासनेचे स्वातंत्र्य मिळाले. भारतातील विविध जातीधर्मांच्या लोकांना राज्यघटनेने हे स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्थेच्या अधीन राहून पाळण्याचे अधिकार या कलमाने दिले. भारतीय समाजावर असणारा धर्माचा,धार्मिक चालीरीतींचा पगडा, याचा अभ्यास करून बाबासाहेबांनी मूलभूत हक्कांमध्ये हे स्वातंत्र्य बहाल केले आहे. यासोबतच अल्पसंख्याकांना सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आपली भाषा व संस्कृती जपण्याचा अधिकार दिला आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणताही नागरिक त्याच्यावरील अन्यायासाठी ,हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे.

बाबासाहेब स्वतः वंचित समाजातून आले होते, पण त्यांनी फक्त मागासवर्गीयांसाठी नव्हे तर सर्व समाजासाठी न्याय व्यवस्था उभी केली. अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षण, समान संधी,सामाजिक न्यायासाठी कायदेशीर संरक्षण त्यांनी दिले. सोबतच कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली.

भारतीय संविधान सामाजिक, आर्थिक, राजकीय, समानता देण्याच्या दृष्टीने अतिशय उत्तम अशी घटना आहे मात्र या घटनेचा वापर कोण करणार? कसा करणार ? आणि किती प्रामाणिकपणे करणार? यावरच घटनेच्या अंमलबजावणीचे फलित अवलंबून असेल असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी घटना निर्माण करणाऱ्या संविधान सभेपुढे बोलताना तीन महत्त्वाचे इशारे दिले होते

ते म्हणाले होते, देशातील सामाजिक असमानता दूर होणे आवश्यक आहे. आम्ही सर्वप्रथम भारतीय होणे आवश्यक आहे.त्यांनी परस्पर बंधुतेवर भर दिला. बंधुता म्हणजे राष्ट्रातील सर्व लोकांमध्ये बंधूभाव आणि एकतेची भावना निर्माण करणे होय.

त्यांनी दुसरा इशारा दिला होता आर्थिक विषमतेचा. देशातील सर्व नागरिकांचा समतोल आर्थिक विकास होणे आवश्यक आहे, कारण आर्थिक विषमता श्रीमंत-गरीब दरी वाढवते. ही दरी वाढली तर असंतोष वाढेल. भारत हा विविध धर्मांचा देश आहे. कोणत्याही धर्माचा द्‌वेष, वाढायला नको. धर्माधारित द्‌वेष राष्ट्राच्या एकात्मतेला तडा देईल. हे इशारे आजही तितकेच महत्त्वाचे आहेत.


भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संच नाही, तर त्यात राष्ट्रनिर्मितीचा स्वयंस्पष्ट आराखडा आहे. बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून संघराज्य व्यवस्था मजबूत केली केंद्र आणि राज्य यांच्यात संतुलन ठेवले. न्यायव्यवस्थेला स्वातंत्र्य दिले.यामुळे भारत एक अखंड आणि सक्षम राष्ट्र बनला.

**-प्रवीण टाके, उपसंचालक** (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर,

## बदलते तंत्रज्ञान

### नवीन स्मार्टफोनमध्ये सिलिकॉन कार्बन बॅटरीचा वापर

स्मार्टफोन वापरकर्त्यांसाठी बॅटरी नेहमीच सर्वात मोठी चिंता राहिली आहे. रोज चार्ज करणे ही एक सवय बनली आहे. पण आता ही परिस्थिती बदलत आहे. कंपन्या एका नवीन बॅटरी तंत्रज्ञानावर काम करत आहेत, जे फोनचा आकार न वाढवता जास्त बॅटरी देण्याचे वचन देते.



या तंत्रज्ञानाला सिलिकॉन-कार्बन बॅटरी म्हणतात. हे नवीन स्मार्टफोन्समध्ये येत आहे. अलीकडेच वनप्लसच्या नॉर्ड-६ मध्ये पहिल्यांदा ९ हजार mAH बॅटरी देण्यात आली आहे. सॅमसंगनेही पुष्टी केली आहे की त्यांच्या आगामी स्मार्टफोनमध्ये सिलिकॉन बॅटरी आणण्याची त्यांची योजना आहे.

ही बॅटरी कशी वेगळी आहे?

लिथियम-आयन बॅटरीमध्ये ग्रॅफाइटचा वापर होतो, जिथे लिथियम आयन फिरतात आणि वीज निर्माण होते. सिलिकॉन-कार्बन बॅटरीमध्ये ग्रॅफाइटऐवजी सिलिकॉनचा वापर होतो. सिलिकॉन ग्रॅफाइटच्या तुलनेत अनेक पटींनी जास्त लिथियम आयन साठवू शकते. सोप्या भाषेत सांगायचे तर, जसे एका खोलीत जास्त लोकांना जागा मिळते, तसेच या बॅटरीमध्ये जास्त ऊर्जा साठवली जाऊ शकते.

वापरकर्त्यांना हे तीन फायदे

या तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा फायदा हा आहे की, फोनचा आकार न वाढवता बॅटरीची क्षमता वाढवता येते. म्हणजेच, जिथे आधी ५,०००mAh ची बॅटरी मिळत होती, तिथे आता त्याच आकारात ६,५००mAh किंवा त्याहून अधिक बॅटरी दिली जात आहे.

नवीन तंत्रज्ञानामुळे कंपन्यांकडे पर्याय आहे. ते दोन मार्ग अवलंबू शकतातः एकतर जास्त बॅटरी देऊन फोनचा बॅकअप वाढवावा किंवा तीच बॅटरी ठेवून फोनला अधिक पातळ आणि हलके बनवावे.

या बॅटरीज वेगवेगळ्या हवामानातही उत्तम काम करतात. थंडीत किंवा जास्त उष्णतेतही त्यांची कार्यक्षमता अधिक स्थिर राहते. फोन गरम झाल्यावर चार्जिंगच्या वेगावर कमी परिणाम होतो. ॲपल-सॅमसंग दोन्ही या तंत्रज्ञानावर काम करत आहेत. सॅमसंगने कार्बन सिलिकॉन बॅटरीची चाचणीही केली आहे. तर, ॲपल सध्या या तंत्रज्ञानावर काम करणे टाळत आहे

# विनोदी लेखक द.मा. मिरासदार



## निमित्त

दत्ताराम मारुती मिरासदार हे मराठीतले साहित्यिक, कथाकथनकार, विनोदी लेखक, पटकथाकार आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष होते. त्यांचे शिक्षण अकलूज, पंढरपूर येथे झाले. पुण्यात आल्यावर ते एम्.ए. झाले. काही वर्षे पत्रकारीता केल्यानंतर त्यांनी इ.स. 1952 साली अध्यापनक्षेत्रात प्रवेश केला. पुण्याच्या कँप एज्युकेशनच्या शाळेत ते शिक्षक होते. इ.स. 1961 मध्ये ते मराठीचे प्राध्यापक झाले.

व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील आणि द. मा. मिरासदार ही त्रयी 1962 सालापासून महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात कथाकथने करीत असत. कथाकथनाचे तीनहजारांहून अधिक कार्यक्रम केल्याने या त्रयीच्या कार्यक्रमात परिपक्वता जाणवत असे. द. मा. मिरासदार ध्वनीक्षेपकासमोर उभे राहून हातवारे करीत बोलू लागले की, श्रोत्यांना एक अद्भुत नाट्य अनुभवायला मिळे. मिरासदारांच्या कथाकथनाचे कार्यक्रम महाराष्ट्राबाहेरही कलकत्ता, इंदूर, हैदराबादसारख्या शहरांतून कार्यक्रम झाले. त्याचप्रमाणे त्यांनी कॅनडा-अमेरिकेतल्या 23 गावांतून 25 कार्यक्रम करायचा विक्रमही केला होता.

कथाकथनाखेरीज त्यांची विनोदी भाषणेही गाजत असत. द. मा. मिरासदार यांच्या कथाकथनाचे कार्यक्रम वाईच्या वसंत व्याख्यानमालेत आणि वाई प्राज्ञपाठशाळेच्या सरस्वती उत्सवामध्ये अनेकदा झाले आहेत.

मराठीतील श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी, चिं.वि. जोशी, आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे यांनी जोपासलेली विनोदी लेखनाची परंपरा द. मा. मिरासदारानी पुढे सुरू ठेवली. मिरासदारांच्या व्यंकूची शिकवणी, माझ्या बापाची पेंड, शिवाजीचे हस्ताक्षर, भुताचा जन्म, माझी पहिली चोरी, हरवल्याचा शोध इत्यादी कथा उत्कृष्ट लिखाण आणि त्याचे इत्तम सादरीकरण यामुळे वाचकांच्या आणि श्रोत्यांच्या मनात कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. गप्पागोष्टी, गुदगुल्या, मिरासदारी, गप्पांगण, ताजवा, असे 24 कथासंग्रह, 18 विनोदी चित्रपटांच्या पटकथा त्यांच्या नावावर आहेत. 'एक डाव भुताचा' या चित्रपटात कथा-पटकथा लेखनासह हेडमास्तरची भूमिकाही त्यांनी केली होती. मिरासदारांच्या लेखनात अस्सल विनोदी अशी अनेक गावरान पात्रे आढळतात. त्यात नाना चेंगट, गणा मास्तर, रामा खरात, बाबू पैलवान, सुताराची चहाटळ आनशी, ज्ञानू वाघमोडे, अशी एकाहून एक अस्सल इब्लीस, बेरकी, वाह्यात, टारगट आणि क्वचित भोळसट अशी ही सारी पात्रे आहेत. ती श्रोत्यांना खळाळून हसायला लावत.

त्यांच्या बहुतेक कथा ग्रामीण जीवनावर आहेत. ग्रामीण जीवनातील विसंगतीचे, विक्षिप्तपणाचे आणि इरसालपणाचे दर्शन घडवून त्यातील विनोद मिरासदारांनी आपल्या कथांतून फुलवला. असे असले, तरी 'स्पर्श', 'विरंगुळा', 'कोणे एके काळी' सारख्या काही गंभीर कथांतून त्यांनी जीवनातील कारुण्यही प्रत्ययकारीपणे टिपले आहे. तथापि त्यांची स्वाभाविक प्रवृत्ती मिस्किल कथा लिहिण्याकडेच आहे.

पुण्यात झालेल्या 83 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांनी 'भुताची गोष्ट' ऐकवली. ही गोष्ट दीड तासाहून अधिक काळ रंगली होती.

साभार : इंटरनेट

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### कॉफीचे पिण्याचे हे आहेत फायदे आणि तोटे...

ऑफिसमध्ये दीर्घ बैठका आणि दीर्घ कामकाजाच्या तासांसाठी कॉफी इंधन म्हणून काम करते. आता कॉफी ही प्रत्येक ऑफिसमधील लोकांची जीवनरेखा बनली आहे.

पण ही कॉफी तुमची झोपच हिरावून घेत नाही तर तुमची कोलेस्टेरॉल पातळीही वाढवत आहे.कॉफी बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मशीनमुळे कोलेस्टेरॉलची पातळी वाढत आहे. यामुळे हृदयरोगाचा धोका देखील वाढू शकतो.जर कॉफी गाळली नसेल तर त्यात डायटरपेन्स असतात जे कोलेस्टेरॉल वाढवू शकतात. सहसा ऑफिसमध्ये फिल्टर कॉफी नसते. त्यामुळे ऑफिस मशीनमधून बनवलेली कॉफी पिल्याने कोलेस्टेरॉल वाढण्याचा धोका जास्त असतो.



डॉ. अमर सिंघल यांच्या मते, मशीनमधून बनवलेल्या कॉफीमध्ये डायटरपीन्सचे प्रमाण जास्त असते, जे कोलेस्ट्रॉल वाढवते. म्हणूनच ते अधिक नुकसान करते. तर फिल्टर कॉफी तितकी हानिकारक नाही. कोणत्याही प्रकारची कॉफी जास्त प्रमाणात सेवन केल्यास अनेक नुकसान होऊ शकतात.

न्यूट्रिशन, मेटाबोलिझम अँड कार्डिओव्हस्कुलर डिसीज मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, डायटरपीनयुक्त कॉफीचे जास्त सेवन केल्याने हृदयरोगाचा धोका वाढू शकतो. तथापि, हे तुम्ही कोणत्या प्रकारची कॉफी पिता यावर अवलंबून असते.जर तुम्ही दिवसभर एस्प्रेसो, फ्रेंच प्रेस किंवा मशीन-ब्रू कॉफी सारखी फिल्टर न केलेली कॉफी प्यायली तर तुमच्या कोलेस्टेरॉलची पातळी वाढू शकते, ज्यामुळे हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढू शकतो.

साधारणपणे बहुतेक लोक सकाळी कॉफी पिण्याचा सल्ला देतात. कारण १२ ते १४ तास कॉफी पिल्यानंतरही कॅफिन शरीरात राहते आणि मेंदूतील न्यूरॉन्स सक्रिय ठेवते. म्हणून, जास्त कॉफी पिल्याने मेंदूच्या क्रियाकलापांवर परिणाम होऊ शकतो. असे असूनही, कॉफी कधी आणि कशी प्यावी याचे नियोजन करा-परीक्षेपूर्वी रात्री अधूनमधून कॉफी पिणे ठीक आहे, परंतु सामान्य परिस्थितीत, दुपारी ४ नंतर कॉफी पिऊ नये कारण संध्याकाळी कॉफी घेतल्याने रात्रीच्या झोपेवरही परिणाम होतो. चहा आणि कॉफीमधील कॅफिन आणि टॅनिनशी प्रतिक्रिया देतात तेव्हा ते आपल्या शरीरासाठी हानिकारक असतात. यामुळे आपल्याला पोटात जळजळ आणि गॅसची समस्या होते.

# श्रीवर्धन शहरात कचरा उचलण्याचा प्रश्न गंभीर

## घंटागाड्या बंद आणि कामगार नसल्याने समुद्रकिनाऱ्यावरील स्वच्छता थांबली

**श्रीवर्धन : बातमीदार**

व्हि. डी. के. फॅसिलिटीज या खाजगी कचरा उचलणाऱ्या ठेकेदाराचे कंत्राट संपल्यामुळे श्रीवर्धन शहरातील साफसफाई चे काम बंद पडले आहे. पुणे येथील ठेकेदार व्हि.डी. के. फॅसिलिटीज या कंपनीने श्रीवर्धन नगर परिषदेचे अनेक दिवसांपासून कचरा उचलण्याचे व साफसफाईचे कंत्राट घेतलेले होते. परंतु या ठेक्याची मुदत संपल्यामुळे कंपनीने काम बंद केले आहे. त्यामुळे शहरातील कचरा उचलणाऱ्या घंटागाड्यांवरील कामगार देखील कामावर येत नसल्यामुळे मागील दोन दिवसांपासून श्रीवर्धन शहरातील कचरा उचलला गेला नाही. याच कंपनीचे लोक श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील धुप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती स्वच्छता करण्याचे काम करीत असत.



परंतु मागील आठवडाभरापासून श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील स्वच्छतेचे काम देखील थांबलेले असल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर अस्वच्छता पसरली आहे. अनेक लोकांनी कचऱ्याचे भरून ठेवलेले डबे तसेच असल्यामुळे दुर्गंधी पसरून रोगराईचा प्रश्न उत्पन्न होणार आहे. मात्र श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाकडून याबाबत कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. सदर ठेकेदार हा नगरपरिषदेकडून प्रती कामगार ६२७ रुपये इतकी रक्कम घेत होता. परंतु प्रत्येक चालक किंवा सफाई कामगार यांना फक्त प्रतिदिन ३३३ रुपये देण्यात येत होते. तर कामगारांना दोन ते तीन महिन्यांपासून वेतन देखील मिळालेले नव्हते. त्यामुळे कंत्राटी सफाई कामगारांमध्ये नाराजीचे वातावरण होते.

श्रीवर्धन नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक होऊन नवीन सत्ता स्थापना झाल्यापासून शहरातील अनेक कामे बारगळल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे थेट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार या निवडणुकीमध्ये पराभूत झाल्यामुळे, श्रीवर्धनच्या आमदार व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी श्रीवर्धन कडे लक्ष देणे बंद केल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील पार्किंगचा प्रश्न तातडीने सोडवणे गरजेचे आहे. र.ना. राऊत विद्यालयाच्या पटांगणातील पार्किंग लवकरच बंद होणार आहे. त्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती गाड्या उभ्या करण्यासाठी मोठी समस्या निर्माण होणार आहे. तरी याबाबतीत अदिती तटकरे यांनी लक्ष द्यावे. अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# व्याज, दुप्पट परतावा देण्याच्या आमिषाने लाखो रुपयांची फसवणूक

**चौक : प्रतिनिधी**

पैशाच्या गुंतवणुकीवर दुप्पट, तिप्पट व्याज देण्याचे, बक्षिसांचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक केल्याची चर्चा गेली सहा महिने चौक, खालापूर परिसरात जोरदार होती, आज प्रत्यक्ष एका महिलेसह तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता आहे.

चौक व खालापूर येथे सुसज्ज कार्यालय सुरू करून परिसरातील मोठे व्यावसायिक,नोकरदार वर्ग ते सर्वसामान्य यांच्या भेटी घेऊन त्यांना आपल्या सावी कन्सलटन व अन्य दोन कंपनीत गुंतवणूक करण्यासाठी प्रयत्न करत असत, चांगले व्याज, थोड्याच अवधीत दुप्पट रक्कम याची अनेक गुंतवणूकदार यांना

### महिलेसह इतरांना बेड्या

भूल पडलीं.यावेळी कार्यालयाच्या माध्यमातून गुंतवणूकदार यांना गिफ्ट,चांगली वागणूक देऊन त्यांना आकर्षित केले जायचे,

त्यामुळे गुंतवणूकदार हे ओढले गेले, विशेष म्हणजे येथील स्थानिक लोकच हे काम करून स्थानिक लोकांची फसवणूक करीत होते,कंपनीत काम करणारे हे स्थानिक आहेत, त्यांच्याच भरवशावर स्थानिक लोकांनी आपली गुंतवणूक केली, अगदी सुरुवातीला गिफ्ट देणे, चांगली वागणूक देणे बरोबर परतावा देखील देण्यात येत होता,कालांतराने गिफ्ट, आमिष, चांगली वागणूक ही कमी झाली, व्याज न देणे,दिलेला शब्द पूर्ण न करणे या गोष्टी सुरू झाल्याने गुंतवणूकदार यांना संशय वाढू लागला.

दरम्यान खालापूर येथील प्रशस्त कार्यालयात बसून कामकाज करणारे क्वचित दिसत असत.कार्यालय सतत बंद दिसत असल्याने गुंतवणूकदार यांनी कुठे विचारणा करायची?त्यामुळे कंपनीच्या स्थानिक पदाधिकारी यांच्याशी वाद सुरू झाले, पण कुणीही गुंतवणूकदार पोलिसात तक्रार देण्यास तयार नव्हते.हळूहळू ही गुंतवणूक मोठी असून अनेकजण यात फसले आहेत,याची परिसरातील लोकांना माहिती मिळू लागल्यावर हे गुंतवणूकदार एकत्र येऊन त्यातील एकाने खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला

# खालापुरातील दोन ग्रामपंचायत पोटनिवडणुक बिनविरोध

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील एकूण पाच ग्राम पंचायत पोट निवडणुकीत दोन ग्राम पंचायत बिनविरोध निवड झाली.

ग्राम पंचायत यांच्या पोट निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून आज अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. खालापूर तालुक्यातील एकूण पाच ग्राम पंचायत यांची पोट निवडणूक लागली आहे.

यात खरीवली, जांभिवली, होराळे, आणि जांबरुंग या चार ग्राम पंचायत सदस्य पदासाठी तर गोरठण बुद्रुक ही थेट सरपंच पदासाठी निवडणूक होत आहे. खरीवली व जांभिवली येथे एकच अर्ज दाखल झाल्याने ही ग्राम पंचायत बिनविरोध झाली आहे,तर जांबरुंग येथे अर्ज दाखल न झाल्याने पुन्हा निवडणूक लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.होराळे येथे तीन जागांसाठी पाच अर्ज दाखल करण्यात आले आहेत.तर गोरठण बुद्रुक येथे थेट सरपंच पदासाठी तीन अर्ज दाखल करण्यात आले आहेत.अद्याप छाननी आणि अर्ज मागे घेण्यास मुदत असल्याने उर्वरित तिन्ही बिनविरोध होत आहेत का? हे बघणे उचित ठरेल.

# बाप्पाच्या जागेवर अतिक्रमण ; गणपती संस्थान महड आणि ग्रामस्थांची कारवाईची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

श्री गणपती संस्थान महड यांच्या मालकीचे जागेत कोणतीही परवानगी न घेता अनाधिकृत संरक्षक भिंत बांधण्यात आली असून संस्थानाचे व्यवस्थापक यांनी याबाबत प्रशासनाकडे लेखी निवेदन देत कारवाईची मागणी केली आहे.

अष्टविनायक पैकी एक प्रसिध्द तीर्थक्षेत्र नगरपंचायत खालापूर हद्दीत येत असून परिसरात श्री गणपती संस्थान महड यांची शेकडो एकर जमीन असून त्यावर श्री गणपती देव महड वहिवाटदार व्यवस्थापक नावाने नोंदणीकृत सातबारा आहे. राष्ट्रीय महामार्गावर मंदिराकडे जाताना संस्थानाच्या मोक्याच्या



जागेवर रातोरात अनधिकृत संरक्षक भिंत बांधकाम करण्यात आले आहे. याबाबत माहिती मिळताच ग्रामस्थांनी देखील जाऊन काम बंद पाडले होते. परंतु रात्रीच्या अंधारात पुन्हा काम करण्यात आले. संस्थानचे व्यवस्थापक अतुल काशिनाथ तट्टू आणि राजेंद्र सिताराम बडगुजर यांनी नगरपंचायत खालापूर, तहसील कार्यालय आणि पोलीस ठाणे या ठिकाणी लेखी तक्रार अर्ज दिले आहेत .दोषींवर कारवाई करावी आणि देवस्थानच्या जमिनीचे संरक्षण करावे अशी मागणी केली आहे.

महड परिसरात इनामदार आणि गुरुचरण अशी मोठ्या प्रमाणात जागा आहे संस्थानाच्या नावावर शेकडो एकर जमीन असून या जागेचा उपयोग धार्मिक तसेच भविष्याच्या दृष्टीने विकासासाठी ठेवण्यात आला आहे. परंतु तालुक्यातील जमिनीला आलेला सोन्याचा भाव याचा फायदा उचलत दलालांची मोठी टोळी या भागात कार्यरत असून गुरचरण जमिनी विकण्याचा सपाटा या टोळीने चालवला आहे.

प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून भविष्यात या ठिकाणी दररोज हजारो भक्त येत असतात भाविकांच्या दृष्टीने भविष्यात विविध सोयी सुविधा उभ्या करताना जागेची गरज असून अशा प्रकारे अतिक्रमण होऊन जागा हडप करण्यात येत असतील तर ग्रामस्थ पूर्णपणे श्री गणपती संस्थान यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत असे मंदार जोशी महड ग्रामस्थ यांनी सांगितले.

> **सदरची जागा श्री देवस्थान संस्थान महड मालकीचे असून ठिकाणी लावलेला संस्थानाचा फलक देखील काढून टाकण्यात आला होता .याबाबत सर्व कागदपत्र पुरावे सादर केल्यानंतर तहसीलदार यांनी सदरचे अतिक्रमण हटवण्याचे आदेश दिले असून नगरपंचायतीकडे सदरच्या अतिक्रमण हटवण्यासाठी पाठपुरावा करत आहोत**
> **–मोहिनी वैद्य कार्याध्यक्षा**
> श्री गणपती संस्थान महड

# रिस येथील तरुणाला गुंतवणुकीच्या आमिषाने ३८ लाखांचा गंडा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक केल्यास भरघोस परतावा मिळेल, असे आमिष दाखवून रसायनीतील रीस येथील एका व्यक्तीची तब्बल ३८ लाख ३१ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात अनोळखी सायबर भामट्यांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फसवणूक झालेले जितेंद्र कुमार श्रीवास्तव हे रसायनीजवळील रिस गावचे रहिवासी आहेत.त्यांना काही दिवसांपूर्वी काव्य जैन नावाच्या एका अनोळखी महिलेचा व्हॉट्सअॅपवर कॉल आला होता. तिने श्रीवास्तव यांना क्रिप्टो करन्सीमध्ये ट्रेडिंग करण्याचा सल्ला दिला. तसेच, यातून मोठा नफा मिळवून देण्यासाठी शशिकांत नावाच्या कथित ट्रेडिंग एक्सपर्ट'चा मोबाईल नंबर त्यांच्यासोबत शेअर केला.




श्रीवास्तव यांनी शशिकांतशी संपर्क साधला असता, त्याने त्यांना एक लिंक पाठवून मोबाइलवर ट्रेडिंग अॅप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर फॉर्म भरण्याची प्रक्रिया पूर्ण करून श्रीवास्तव यांनी सुरुवातीला १० हजार रुपयांची गुंतवणूक केली. या पहिल्या गुंतवणुकीवर त्यांना लगेच नफा मिळाला.

यानंतर, "सतत ट्रेडिंग केल्यास असाच मोठा नफा मिळेल, मात्र नफ्यातील ३० टक्के रक्कम आम्हाला द्यावी लागेल," अशी अट भामट्यांनी घातली. सुरुवातीला मिळालेल्या नफ्यामुळे विश्वास बसल्याने श्रीवास्तव यांनी भामट्यांच्या सांगण्यावरून टप्प्याटप्प्याने तब्बल ३८ लाख ३१ हजार रुपये गुंतवले.

काही दिवसांनंतर त्यांच्या अॅपवरील खात्यात तब्बल १ कोटी १८ लाख रुपयांचा नफा झाल्याचे त्यांना दिसले. मात्र, जेव्हा श्रीवास्तव यांनी ही नफ्याची रक्कम स्वतःच्या बँक खात्यात ट्रान्सफर करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ती जमा झाली नाही. याबाबत त्यांनी पुन्हा शशिकांतशी संपर्क साधला असता, त्याने रक्कम काढण्यासाठी आधी ४० लाख रुपये 'सिक्युरिटी डिपॉझिट' भरावें लागेल, अशी नवी मागणी केली.

अगोदरच मोठी रक्कम गुंतवली असताना पुन्हा लाखो रुपये मागितल्याने आपली फसवणूक झाल्याचे श्रीवास्तव यांच्या लक्षात आले. त्यांनी डिपॉझिट भरण्यास नकार देत थेट तळोजा पोलीस ठाणे गाठून रीतसर तक्रार नोंदवली. या प्रकरणाचा पुढील तपास तळोजा पोलीस करत आहेत. वाढत्या सायबर फसवणुकीच्या घटना पाहता नागरिकांनी अशा अनोळखी लिंक आणि गुंतवणुकीच्या आमिषांना बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.१२) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ४८३ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई केली

# मुठवली खुर्द शाळेत बालकांच्या आठवडा बाजाराचे आयोजन

**रोहे : प्रतिनिधी**

शाळा मुठवली खुर्द येथे बालकांच्या आठवडा बाजाराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी लहानग्यांनी आठवडा बाजाराचा अनुभव घेतला.

पिंगळसई केंद्रातील रा.जि.प.शाळा मुठवली खुर्द या शाळेत मुलांना व्यवहार ज्ञानाचे धडे देणे, प्रत्यक्ष अनुभव घेणे. बाजार संकल्पना मुलांच्या अंगी रुजविण्याच्या उद्देशाने रा.जि.प. शाळा मुठवली खुर्द, शाळा मालसई, शाळा मालसई वाडी येथील शाळांचे व्यवस्थापन समितीचे सर्व अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, तसेच मुठवली शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली वेळे, उपशिक्षक अनिल सुटे यांच्या सुयोग्य नियोजनाखाली आणि श्रीमती. पुष्पलता शिंदे, मांडलुस्कर, अरुण आगळे यांच्या सहकार्यातून मुठवली खुर्द शाळेत आठवडा बाजार



व खाऊ गल्ली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे उद्घाटन ग्रुप ग्रामपंचायत मालसई सरपंच कविता शेळके यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या बाजारात मुलांनी दुकानाचे स्वतः मालक होऊन आपल्या वस्तू विकणे तसेच वस्तू खरेदी करणे, रुपये पैसे यांची देवाण घेवाण तसेच व्यवहार हाताळणे यांचा स्वानुभव घेतला.

# माणगावात भरदिवसा घरफोडीची घटना

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात पुन्हा एकदा घरफोडीची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास माणगाव पोलीस ठाणे हद्दीतील मौजे श्री समर्थकृपा, वाकडाईनगर (उत्तेखोल) येथे एका बंद घरावर चोरट्याने डल्ला मारल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला घराबाहेर असताना अज्ञात चोरट्याने घराच्या पाठीमागील दरवाजास जबरदस्तीने धक्का देऊन तो उघडला व घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटे व सामान अस्ताव्यस्त करून चोरट्याने सुमारे २ लाख ६५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. ही घटना उघडकीस येताच परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांनी सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली आहे.

दिवसाढवळ्या अशा प्रकारची घटना घडल्याने पोलीस गस्त व सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ११०/२०२६ अंतर्गत भा.न्या.सं. कलम ३०५(अ) व ३३१(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार फडताडे करीत असून, आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक सक्रिय झाले आहे. दरम्यान, नागरिकांनी आपली घरे सुरक्षित ठेवण्यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी, संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# खालापुरात बेशिस्त वाहन चालकामुळे लाल परीची रखडपट्टी



### प्रवाशांना मनस्ताप

**खोपोली, : प्रतिनिधी**

बस स्थानक खालापूर परिसरात चार चाकी मुख्य रस्त्यावर उभी करून ठेवल्याने वाहतुकीस अडचण निर्माण होऊन प्रवाशाचा खोळंबा होण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

खालापूर शहरातील बस स्थानक परिसर कायम वर्दळीचा असतो . या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र, तहसील कार्यालय ,पोलीस ठाणे भूमी अभिलेख कार्यालय आहेत . कामानिमित्त येणारे वाहन बस स्थानक परिसरात उभी करून निघून जातात. बस स्थानकातून बाहेर पडणाऱ्या एसटीला वळण घेताना अशा वाहनांचा नेहमी अडथळा होत असतो. अनेकदा हे वाहन चालक जागेवर नसल्याने एसटी मागेपुढे करत कसरतीने बाहेर काढण्याची तसदी एसटी चालकाला घ्यावी लागते .असे प्रकार नेहमीच घडत असून त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाया जातो. वाहतूक पोलिसांनी अशा बेशिस्त वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी प्रवासी करत आहेत.

> **सध्या नगरपंचायतीने एक कर्मचारी नेमला असून तो न्यायालय परिसरातील मुख्य रस्त्यावर उभे राहणाऱ्या वाहनांचे नियंत्रण करतो. बस स्थानक परिसरात देखील लक्ष ठेवण्यासाठी सूचना देण्यात येतील .तसेच एसटी वळण घेत असलेल्या ठिकाणी उभ्या राहणाऱ्या वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी त्या ठिकाणी नो पार्किंगचा फलक बसविण्यात येईल.**
> **–रोशना मोडवे**
> नगराध्यक्षा खालापूर नगरपंचायत

**वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी...**

मध्यंतरी खालापूर नगरपंचायतीने वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी दोन कर्मचारी नेमले होते. वाहन मुख्य रस्त्यावर उभे राहू नये तसेच वाहतुकीचा अडथळा होऊ नये यावर लक्ष ठेवण्याचे काम करत होते. तसेच ज्येष्ठ महिला आणि सामाजिक कार्यकर्त्या क्षमा आठवले यानी देखील स्वतःचा वेळ खर्च करून उन्हातानात उभे राहून बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला होता. बेशिस्त वाहन चालकांना कंटाळून काही एसटी चालक खालापूर शहरात एसटी न आणता परस्पर घेऊन जात असल्याने प्रवाशांची अडचण होते.

# खासदार तटकरेंच्या प्रयत्नांना यश ; माणगाव बायपास अंतिम टप्प्यात

**माणगाव: प्रतिनिधी**

दररोजच्या वाहतूक कोंडीने हैराण झालेल्या माणगावकरांसाठी आणि कोकणातून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांसाठी अखेर एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. अनेक वर्षे चर्चेत असलेला आणि अडथळ्यांच्या गर्तेत अडकलेला माणगाव बायपास आता पूर्णत्वाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. खासदार सुनील तटकरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि अथक प्रयत्नांमुळे या प्रकल्पाला गती मिळाली असून, येत्या जून महिन्यापर्यंत बायपासची एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली होणार असल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

माणगाव शहरातील अरुंद रस्ते, वाढती वाहतूक आणि सतत होणारी कोंडी यामुळे नागरिकांचा जीव अक्षरशः त्रस्त झाला होता. अनेकांना दररोज तासन्तास वाहतुकीत अडकून पडावे लागत होते. काहींना आपली कामे गाठता येत नव्हती, तर काहींनी अपघातांत आपले जीव गमावले. या साऱ्या वेदनादायी पार्श्वभूमीवर हा बायपास म्हणजे माणगावकरांसाठी एक आशेचा किरण ठरत आहे. गेल्या वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते व कोकण संघटक अॅड. राजीव साबळे यांनी बायपासचे काम तातडीने सुरू न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. या इशाऱ्याची गंभीर दखल घेत खासदार सुनील तटकरे यांनी दिल्लीपासून मंत्रालयापर्यंत पाठपुरावा करत प्रकल्पाला नवसंजीवनी दिली. निविदा प्रक्रिया गतीमान केली, भूसंपादनातील अडथळे दूर केले आणि वेळोवेळी आढावा बैठका घेत प्रशासनाला सतर्क ठेवले.

केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी तसेच स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी सातत्याने संपर्क साधून त्यांनी या कामासाठी आवश्यक ते सहकार्य मिळवले. याशिवाय, रेल्वे मार्गावरील पुलासाठी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी कुमार यांची भेट घेऊन मेगा ब्लॉकसाठी परवानगी मिळवणे हे देखील एक मोठे पाऊल ठरले. सध्या गोद आणि काळ नदीवरील पूल, गर्डर बसविणे, भराव टाकणे आणि उर्वरित रस्त्यांची कामे अंतिम टप्प्यात असून, सुमारे ३०० अभियंते आणि कामगार दिवस–रात्र मेहनत घेत आहेत. या अथक परिश्रमांचे फळ लवकरच सर्वसामान्यांना मिळणार आहे.

हा बायपास सुरू झाल्यानंतर माणगाव शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, प्रवास अधिक सुरक्षित आणि जलद होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सतत घडणाऱ्या अपघातांना आळा बसेल आणि अनेकांचे जीव वाचतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे. मुंबई–गोवा महामार्गाच्या कामालाही यामुळे गती मिळणार असून, पुढील वर्षी तोही पूर्णत्वास जाईल, अशी अपेक्षा आहे. मात्र, तात्पुरता दिलासा देणारा हा माणगाव बायपास सुरू होणं हीच नागरिकांसाठी मोठी दिलासादायक बाब ठरत आहे. खासदार सुनील तटकरे यांच्या अथक प्रयत्नांमुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला हा प्रकल्प आता प्रत्यक्षात साकार होत असल्याने माणगावकरांनी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. हा बायपास केवळ रस्ता नसून, तो माणगावच्या नागरिकांच्या संयम, संघर्ष आणि आशेचा विजय असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

# ‘हापूस’ला अवकाळी पावसाचा फटका

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकणातील हापूस आंब्याला यंदा अवकाळी पावसाचा मोठा फटका बसल्याने उत्पादनात लक्षणीय घट झाली असून केवळ सुमारे २५ टक्केच उत्पन्न उपलब्ध झाले आहे. परिणामी, यंदाचा हंगाम मर्यादित राहण्याचे स्पष्ट झाले असून दरवर्षीपेक्षा लवकर म्हणजेच १० मेच्या आधीच आटपण्याची शक्यता व्यापारी आणि आंबा बागायतदारांकडून वर्तवली जात आहे.

हंगामाच्या सुरुवातीपासूनच बाजारातील आवक कमी राहिली असली, तरी सध्या त्यात हळूहळू वाढ दिसू लागली आहे. कोकणातून मर्यादित प्रमाणात हापूसच्या पेट्या बाजारात दाखल होत असून, दक्षिण भारतातूनही मोठ्या प्रमाणात पेट्यांची आवक सुरू झाली आहे. दरवर्षी या काळात साधारण एक लाख पेट्यांची आवक होत असते; मात्र यंदा ती मोठ्या प्रमाणात घटली आहे. सध्या एकूण आवक सुमारे ४० हजार पेट्यांपर्यंत पोहोचली असून पुढील काही दिवसांत ती ५० ते ५५ हजार पेट्यांपर्यंत जाण्याची शक्यता मुंबई एपीएमसीतील आंबा व्यापाऱ्यांनी वर्तवली आहे.

हंगामाच्या विविध टप्प्यांवरही याचा परिणाम दिसून येत आहे. १० मेपर्यंत बाजारात आवक टिकून राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर देवगड व सिंधुदुर्ग भागातील आंब्यांची उपलब्धता कमी होईल, तर रत्नागिरी व इतर भागातील आंबे २५ मेपर्यंत बाजारात राहतील. पुढे गुजरात व जुन्नर भागातील आंब्यांची आवक सुरू होणार असली, तरी कोकणातील हापूसचा हंगाम त्यापूर्वीच ओसरेल असे मत आंबा व्यापारी संजय पानसरे यांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, आखाती देशातील युद्ध थांबल्याचे म्हटले जात असले तर अंतर्गत कुरघोड्यांमुळे सागरी मार्गाने होणाऱ्या निर्यातीला मोठा फटका बसला आहे. अद्याप आखाती देशातील सागरी मार्गाने होणारी निर्यात सुरू न झाल्याने कोकणातील आणि भारतीय आंबा यंदा आखाती देशातील महत्वाच्या आणि मोठ्या बाजारपेठेला मुकला आहे. त्याशिवाय इतर देशातील निर्यातीवरही वाढत्या वाहतूक खर्चाचा परिणाम झाला आहे. युरोप आणि अमेरिका या बाजारपेठांमध्ये निर्यात अद्याप पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नसून, हवाई वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अमेरिकेसाठी सुमारे ६०० रुपये प्रति किलो, तर युरोपातील देशांसाठी सुमारे ४०० रुपये प्रति किलो इतका खर्च येत असल्याने निर्यातदारांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत.

एकूणच, उत्पादनात झालेली मोठी घट, मर्यादित आवक आणि वाढते दर यामुळे यंदाचा हापूस हंगाम तुलनेने अल्पकाळाचा ठरणार असून ग्राहकांना मर्यादित कालावधीतच हापूसचा आस्वाद घेता येणार आहे.



## हंगाम लवकर आटपण्याची शक्यता

## मागणीसह दरातही वाढ

**स्थानिक बाजारात हापूसला चांगली मागणी असल्याने दरातही वाढ दिसून येत आहे. गुणवत्तेनुसार पेटीमागे २ हजार ते ६ हजार रुपये दर मिळत असून उत्तम दर्जाच्या आंब्यांना ५,५०० ते ६,००० रुपये दर मिळत आहे. इतर राज्यांचा आंबा १०० ते २०० रुपये प्रति किलो दराने विकला जात आहे. याशिवाय बदामी, लालबाग यांसारख्या इतर जातींच्या आंब्यांची आवक वाढत असून त्यांचे दर अनुक्रमे ८० ते ११० रुपये आणि ७० ते १०० रुपये प्रति किलो दरम्यान आहेत.**

# वाशी बसस्थानकाचे वाणिज्य संकुल वापराविना

## तरण तलाव, संकुलासाठी १६७ कोटींचा निधी खर्च

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेने १६७ कोटी खर्चातून सेक्टर १२ येथे जलतरणतलाव बस चार्जिंग स्टेशन तसेच वाणिज्य संकुलाची निर्मिती केली आहे. शहरातील पहिलाच ऑलिम्पिक दर्जाचा तरणतलाव वाशी येथे साकारला असून त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे. मात्र येथे तयार करण्यात आलेले वाणिज्य संकुल पूर्ण क्षमतेने सुरू न झाल्याने वापराविना पडून आहे. पालिकेकडून त्याचा पूर्ण वापर कधी होणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

वाशी सेक्टर १२ येथे तरणतलाव, बसस्थानक तसेच वाणिज्य संकुल आकारास आले असून पालिकेने याच्या निर्मितीसाठी १६७ कोटींपेक्षा अधिक खर्च करून संकुल साकारले आहे. याच संकुलात असलेल्या पालिकेच्या परिवहन विभागाच्या काही बस कमी कालावधीसाठी चार्जिंग करण्यासाठी येतात, मात्र या व्यतिरिक्त संकुलात असलेल्या इतर व्यावसायिक जागेचा अद्याप वापर करण्यात येत नाही.

त्यामुळे वापराविना व्यावसायिक जागा पडून आहे. परिवहन विभागाकडे असलेल्या जागेचा वाणिज्य वापरही होण्यासाठी पालिका प्रयत्नशील असल्याची माहिती पालिकेच्या परिवहन विभागाने दिली आहे. नवी मुंबई शहरात पालिकेचा परिवहन उपक्रम हा तोट्यातील उपक्रम असून पालिकेला दर महिन्याला परिवहन उपक्रमासाठी कोटयवधी रुपये अनुदानापोटी द्यावे लागत आहे.

नवी मुंबई शहरातील अनेक खेळाडूंना जलतरणासाठी शहराबाहेर जावे लागत होते, त्याची उणीव वाशी येथील याच संकुलातील जलतरण तलावामुळे दूर झाली आहे.

तरणतलावामुळे अनेक चांगले खेळाडू निर्माण होण्याबरोबरच महापालिकेला यामधून उत्पन्न प्राप्त होत आहे. यामुळे संकुलाचा कारभार सुस्थितीत राखण्यास तरणतलावाचा हातभार लागत आहे.

> **नवी मुंबई शहरातील वाशी सेक्टर १२ येथील तरणतलावाचा वापर होत आहे. पालिका परिवहन विभागाची वाणिज्य वापराची जागाही लवकरच भाडेतत्त्वावर देण्यात येणार आहे. केंद्रीय विभागाला ही जागा भाडेतत्त्वावर देण्याबाबत नियोजन सुरू आहे.**
> **–योगेश कडुस्कर, परिवहन व्यवस्थापक**





**पनवेल : भोकरपाडा येथील जय हनुमान राधाकृष्ण मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. यावेळी आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.**



**पनवेल : दुंदरेपाडा ग्रामपंचायतीचे माजी सदस्य नारायण चौधरी यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, सुनील पाटील, श्याम भालेकर आदी उपस्थित होते.**

# माय भारत बजेट क्वेस्ट २०२६चा समारोप उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

माय भारत प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयातर्फे आयोजित माय भारत बजेट क्वेस्ट २०२६ (मुंबई विभाग) चा भव्य समारोप डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ येथे यशस्वीरित्या पार पडला. १२ ते १३ एप्रिल २०२६ या दोन दिवसांच्या कालावधीत आयोजित या कार्यक्रमात महाराष्ट्र, गोवा आणि पुडुचेरी येथील युवक–युवतींनी सहभाग घेतला.



या कार्यक्रमातून सहभागी शासन आणि युवकांच्या धोरणात्मक संवादाची सशक्त भावना प्रकर्षाने दिसून आली. कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत भावपूर्ण वातावरणात झाली. महान गायिका आशा भोसले यांच्या आकस्मिक निधनाबद्दल उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण केली तसेच त्यांच्या भारतीय संगीत आणि संस्कृतीतील अमूल्य योगदानाबद्दल आदर व्यक्त करत दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. यानंतर स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून युवकांना राष्ट्रनिर्मितीसाठी प्रेरणा देण्यात आली. त्यानंतर अमित पुंडे, राज्य संचालक, माय भारत महाराष्ट्र व गोवा यांनी माय भारत संदर्भात मार्गदर्शनपर सत्र घेतले. कार्यक्रमातील एक प्रमुख आकर्षण म्हणजे केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मधील ‘विकसित कृषी’ आणि ‘मानवी भांडवल विकास’ या महत्त्वपूर्ण विषयांवर आयोजित तज्ज्ञ पॅनेल चर्चा होय.

या चर्चेत सचिन जाधव, अक्षय खोरगडे, गौरव गुप्ता, अमित गुप्ता, राजलक्ष्मी पाटील आणि विनय कुमार अवारे यांनी सहभाग घेतला. या सत्राचे प्रभावी संचालन संकेत कलांबे यांनी केले. युवकांनी उत्साहाने सहभाग घेत संवाद साधला. याशिवाय, मनोज सानप, जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे यांनी युवकांना मार्गदर्शन करत त्यांना राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घेण्यास प्रेरित केले. त्यांनी सार्वजनिक धोरणांमध्ये सजग आणि माहितीपूर्ण सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमात केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्री, भारत सरकार माननीय मनसुख मांडवीया यांचे आभासी मार्गदर्शन लाभले. त्यांनी देशाच्या विकासप्रक्रियेत युवकांच्या सक्रिय भूमिकेचे कौतुक केले. तसेच माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या ‘पंचप्राण’ संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट करत युवकांनी विकसित भारत @२०४७ या ध्येयपूर्तीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले. या उपक्रमाचे महत्त्व अधिक अधोरेखित करत माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संदेशाद्वारे या कार्यक्रमातील व्यापक सहभाग आणि रचनात्मक संवादाचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला सुजाता पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच “संडेज ऑन सायकल” या रॅलीचे आयोजन करण्यात आले. प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते या रॅलीला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. बी. डी. सोमाणी इंटरनॅशनल स्कूल ते सिडको फुटबॉल स्टेडियम या मार्गावर ३५० हून अधिक युवकांनी सहभाग घेत पर्यावरण जागरूकता, तंदुरुस्ती आणि शाश्वत जीवनशैलीचा संदेश दिला. एकूणच, माय भारत बजेट क्वेस्ट २०२६ च्या अंतिम फेरीत ७५० निवडक युवकांनी सहभाग घेतला. त्यांनी तज्ज्ञ आणि धोरणकर्त्यांशी सक्रिय संवाद साधत विकसित भारत @२०४७ या संकल्पनेला बळकटी दिली आणि राष्ट्रनिर्मितीबाबतची आपली ऊर्जा, कल्पकता आणि बांधिलकी प्रदर्शित केली.

# रास्त भाव धान्य पुरवठा शाखा स्थलांतरित करण्याची मागणी

**कळंबोली : बातमीदार**

पनवेल येथील रास्त भाव धान्य पुरवठा शाखा कार्यालय सध्या अनेक समस्यांच्या विळख्यात असून, ते तातडीने शहरातील नवीन प्रशासकीय भवनात स्थलांतरित करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते निलेश सोनावणे यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

सध्या हे कार्यालय साई नगर जवळील तहसील कार्यालयाच्या तळमजल्यावर कार्यरत आहे, मात्र या ठिकाणी कार्यालयाची अवस्था अत्यंत बिकट असल्याचे सोनावणे यांनी निदर्शनास आणून दिले आहे. कार्यालयात कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी आणि नागरिकांना उभे राहण्यासाठी पुरेशी जागा नाही. कार्यालयातील महत्त्वाच्या कागदपत्रांना वाळवी लागली असून, शासनाचे रेकॉर्ड नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

रेशन कार्ड, नवीन धान्य दुकान परवाना आणि तक्रार निवारणासाठी येणाऱ्या नागरिकांना बस डेपोपासून रिक्षाने यावे लागते त्यामुळे अधिक खर्चिक होते. त्यामुळे गैरसोयीचा सामना करावा लागतो. पनवेल शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोर नवीन प्रशासकीय भवन उभारण्यात आले आहे. हे भवन सुसज्ज असून त्या ठिकाणी पुरवठा विभागाला पुरेशी जागा उपलब्ध होऊ शकते. तसेच तालुक्यातील खेड्यापाड्यातील नागरिकांना सहज रित्या या ठिकाणी पोहचता येईल.









**पनवेल : तालुक्यातील गव्हाण पंचक्रोशीत सुप्रसिद्ध असलेल्या शांतादेवीच्या यात्रेला शनिवार आणि रविवार मोठ्या उत्साहात पार पडली. शेकडो वर्षांची परंपरा लाभलेल्या या यात्रेसाठी परिसरातील तसेच दूरवरूनही भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते. यावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत व पंचायत समिती सभापती रंजना वास्कर यांनी यात्रेत सहभागी होत शांतादेवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.**

# ब्रह्मचैतन्य संगीत सभा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ५३ वे पुष्प सादर झाले. येथील ब्रह्मचैतन्य गोंदवेकर महाराज नामस्मरण केंद्रामधे संपन्न झालेल्या या संगीत सभेत रत्नागिरी येथील युवा शास्त्रीय संगीत गायिका वैष्णवी जोशी यांनी आपली संगीत सेवा सादर केली.

आजच्या संगीत सभेची सुरुवात त्यानी अभोगी रागातील विलंबित एकतालाने केली त्यानंतर झपतालामध्ये बंदिश सादर करून त्याला जोडून एकतालामध्ये 'सपने मे आयी शाम' ही बंदिश सादर केली. नंतर 'गणनायका शुभदायका' हे गीत आणि 'विकल मन आज' हे नाट्यगीत सादर केले. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली म्हणून त्यांनी गायलेले 'मी मज हरपून बसले ग'' हे गीत सादर केले. नंतर 'मर्म बंधातली ठेव' हे नाट्यपद, 'संत भार पंढरीत', 'कुणी दत्त पाहिला का माझा' हे अभंग सादर केले. 'कल्याण करी रामराया' या भैरवीपर पदाने संगीतसभेची सांगता केली.

वैष्णवी जोशी यांना गणेश घाणेकर यानी तबला, देवेन मराठे यानी संवादिनी आणि समीर कर्वे यांनी तालवाद्यसाथ केली. समीर सोमण यांनी या कार्यक्रमाचे निवेदन केले. ही सभा यशस्वी होण्यासाठी मठातील कार्यकर्ते आणि मासिक संगीत सभेच्या आयोजकांनी मोलाचे योगदान दिले.

# लायन्स सरगम कराओके स्टार स्पर्धा उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे लायन्स सरगम कराओके स्टार २०२६ या कराओके गायन स्पर्धा नुकत्याच यशस्वीरित्या संपन्न झाल्या. या स्पर्धेला पुणे, अलिबाग, माणगाव, मुंबई, नवी मुंबई आणि पनवेल येथील स्पर्धकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे एक स्पर्धक रतलाम, मध्य प्रदेश येथून सुद्धा सहभागी झाला होता.



या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे उद्घाटन नगरसेवक गणेश कडू यांचे हस्ते संपन्न झाले. त्यांनी सरगम क्लबच्या कार्याचे कौतुक करुन स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. प्रीतम दादा म्हात्रे यांनी देखील या स्पर्धेला उपस्थित राहून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. या वेळी जेष्ठ पत्रकार संजय कदम, पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार मंदार दोंदे , हरेश साठे ,निलेश सोनावणे ,प्रवीण मोहकर , लालचंद यादव,राजू गाडे आदी सदस्य यावेळी उपस्थित होते . यावेळी प्राथमिक फेरीतून निवडल्या गेलेल्या स्पर्धकांची अंतिम फेरी मोठ्या अटीतटीची होती.

पाच गटांमध्ये झालेल्या या स्पर्धेतील विजेत्यांची नावे गट १८ वर्षापर्यंत प्रथम क्रमांक – तनिषा चव्हाण, द्वितीय क्रमांक – निषाद मरोडकर, गट – १८ ते ४० प्रथम क्रमांक – श्रुती सावंत, द्वितीय क्रमांक – सोजी मॅथ्यू, गट – ४१ ते ६० प्रथम क्रमांक – चेतन म्हात्रे, द्वितीय क्रमांक – शिवदास नाखवा, तृतीय क्रमांक – वैशाली देशमुख, उत्तेजनार्थ – सुबोध जोशी, गट – ६१+ प्रथम क्रमांक – सतीश गुणे, द्वितीय क्रमांक – दीपक दास , उत्तेजनार्थ – अमित तांडेल गट – लायन्स प्रथम क्रमांक – दिपाली टेलर, द्वितीय क्रमांक – देवेंद्र पाटणे अंतिम फेरीतील विजेत्यांना रोख बक्षीस, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून द्वितीय प्रांतपाल विजय गणात्रा हे उपस्थित होते. या स्पर्धांच्या प्राथमिक फेरीसाठी विनायक प्रधान आणि सतीश मोरे तर अंतिम फेरीसाठी वंदना सहस्रबुद्धे आणि सुदाम रघुनाथ यांनी परीक्षक म्हणुन काम पाहिले. या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा, सचिव आदित्य दोशी, खजिनदार धवल शहा, अल्केश शहा,संजय गोडसे, स्वाती गोडसे, मानदा पंडित, संध्या महानुभाव, अनिल परमार, सुनील देशपांडे, ओंकार खेडकर, मिलिंद जोशी, अश्विनी खेडकर आदी सभासदांनी परिश्रम घेतले.

# रोहा शैक्षणिक मॉडेल तयार करणार

## ■ खासदार सुनील तटकरे यांचे प्रतिपादन ; कौशल्य विकास प्रशिक्षण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरातील दमखाडी परीसरात डॉ सी.डी.देशमुख प्रवेशद्वार लोकार्पण व टाटा संचलित कौशल्य विकास प्रशिक्षण (ट्रिपल आयटी ) आज भुमीपुजन होत आहे. रोहेकरांसाठी अधिक रोहा सुशोभिकरण करण्यासाठी काम हाती घेतले आहे. पर्यटनासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. साजेशा असे कुंडलिक संवर्धन परीसरात स्टॉल उभारणी करण्यात येणार असून रोहा नगरपरिषदेचे सीएसआर फंडामधून क्रिडांगण उभारण्यात येत आहे.राज्यात कुठे ही नाही असे नगरपालिकेचे डिजीटल शाळा रोह्यात आहे. रोहा शहरात सर्वांगीण विकास सामाजिक बांधीलकी घेऊन काम करणार आहोत. रोहा नवीन शैक्षणिक मॉडेल तयार करणार आहोत. कुंडलिका नदी सुशोभिकरण करण्याचे आहे. रोहयात शिक्षण, आरोग्य, क्रिडा व रोजगार यासाठी प्रयत्न करणार असल्याचे खा.सुनील तटकरे यांनी व्यक्त केले

रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील दमखाडी येथील डॉ. चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख स्वागत कमान उभारणे या कामाचे लोकार्पण व रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील आ.क्र.१४ मधील जागेत आवश्यकती स्थापत्य विषयक कामे करणे या कामाचे भूमिपूजन प्रसंगी खा. सुनील तटकरे यांनी ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे व्यक्त केले.



यावेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, निता हजारे, गौरी बारटक्के, रवी चाळके, नगरसेवक पुर्वा मोहीते, अजित मोरे, अरबाज मणेर, स्नेहा आंबरे, संजना शिंदे, प्रशांत कडु, अलमाज मुमैरे, माज सवाल, रोशन चाफेकर, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, माजी नगरसेवक सुभाष राजे, यशवंत शिंदे, प्राजक्ता चव्हाण, मानसी दाते, समाधान शिंदे, कादीर रोगे, स्वप्नील धनावडे आदी उपस्थित होते.

आपल्या प्रास्ताविकात वनश्री शेडगे यांनी आज महत्वाचे अभिमानाचा दिवस आहे.रोहयाच्या मातीत डॉ. सी.डी.देशमुख यांचे कमानी रुपी स्मारक त्यांच्या कार्याची विचारांची प्रेरणा आपल्या कायमस्वरूपी आठवण देत राहील.प्रवेशद्वार आपल्या शहराची ओळख दाखवणारी ठरणार आहे. खा.सुनील तटकरे व ना.आदीती तटकरे यांच्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी दिल्याने रोहा शहरातील विविध विकास कामे होत आहेत रोहा शहराला पर्यटन चा दर्जा मिळाला आहे. खा.सुनुल तटकरे यांच्या माध्यमातून सी ट्रिपल आयटी, स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू आहे. ज्युनिअर कॉलेज चालु करण्याचा मानस आहे. रोहा डॉ. सी.डी देशमुखना साजेशा असा शैक्षणिक केंद्र बनणार आहे. असे सांगितलेया कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रतीक राक्षे यांनी मानले

# नेरळमध्ये गावठी दारू तस्करी उघड

## सिनेस्टाईल पाठलागानंतर दोघे जाळ्यात, ३.५९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नेरळ : प्रतिनिधी**



नेरळ पोलिसांनी अवैध दारू वाहतुकीवर मोठी कारवाई करत दोन जणांना अटक केली असून ३ लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.रविवार १२ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास करण्यात आलेल्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी शकील खलील शेख (वय २१) आणि योगेश गदलू वायले (वय ३४, दोघे रा. वसारगाव, ता. अंबरनाथ, जि. ठाणे) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. नेरळ पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रायगड–ठाणे सीमेवरील नेरळ पोलिस ठाणे अंतर्गत येत असलेल्या शेलू चेकपोस्ट येथे पोलिसांची रात्री वाहन तपासणी सुरू असताना संशयित पिकअप टेम्पो थांबवण्यात आला. यावेळी चालकाने टेम्पो रिकामा असल्याचे सांगत पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, अचानक टेम्पो भरधाव वेगाने नेरळच्या दिशेने पळवण्यात आला आणि पोलिसांनी थरारक पाठलागाला सुरुवात झाली.

शेलू चेकपोस्ट ठाण्यावर कर्तव्यावर असणाऱ्या पोलिसांनी तत्काळ नेरळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधत माहिती दिली. सतर्क झालेल्या नेरळ पोलिसांनी सापळा रचत टेम्पो अडवला. सिनेस्टाईल पाठलागानंतर अखेर हा टेम्पो नेरळ पोलिसांच्या ताब्यात आला.

तपासणीदरम्यान टेम्पोत काळ्या रंगाचा रबर ट्यूबमध्ये लपवून ठेवलेली गावठी दारू उघडकीस आली. एका ट्यूबमध्ये ३५ लिटरप्रमाणे एकूण ९ ट्यूबमध्ये ३१५ लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली. या दारूची किंमत सुमारे २४ हजार रुपये असून सफेद रंगाचा पिकअप टेम्पो जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

# पेण दादर येथे महिलेवर अत्याचार

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यतील दादर पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या महिला फिर्यादीवर आरोपी रा. दादर याने अत्याचार केल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी कि, महिला फिर्यादी रा. दादर, ता पेण यांना कामानिम्मीत्त आरोपी याने त्यांचे दादर येथील जुने घरी बोलावुन फिर्यादीकडे शरीरसंबंधाची मागणी केली त्याचवेळी फिर्यादी हिने नकार देवुन देखील फिर्यादीचे इच्छेविरूध्द शारिरीक संबंध करून त्या संबंधाचे अश्लील फोटो काढले त्यानंतर आरोपी याने फिर्यादी यांना त्यांचे अश्लील फोटी व्हायरल करिन अशी धमकी देवुन त्यांच्या जुन्या घरी व कळंबुसरे,ता. उरण येथे फोटो डिलीट करण्याच्या उददेशाने पुन्हा बोलावुन घेवुन फिर्यादीचे इच्छेविरूध्द शारिरीक संबंध केले.

याबाबत दादर सागरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ६४(१),६४(२)m,३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सकपाळ हे करीत आहेत

# एक तप रस्त्याची दुरुस्ती नाही ; खालापूर वणवे रस्त्याची दुर्दशा

**खोपोली: प्रातिनिधी**

बारा वर्षांपूर्वी झालेला खालापूर वणवे निंबोडे रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाचा निधी मिळत नसल्याने दोन किलोमीटर अंतराच्या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. खालापूर नगरपंचायत हद्दीत वणवे निंबोडे ही दोन गाव येत असून या गावातून जाणारा रस्ता पुढे सावरोली खारपाडा राज्यमार्गाला जोडला जातो. २०१४ साली तत्कालीन आमदार सुरेश लाड यांच्या प्रयत्नाने कित्येक वर्ष



रखडलेला रस्त्याचे डांबरीकरण झाले होते. परंतु ठेकेदाराने काही ठिकाणी दर्जाचे काम केल्याने रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. दीड वर्षांपूर्वी निंबोडे पासून वणवे गावाच्या काही भागापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले. परंतु पुढील अर्धा टप्पा निधी नसल्याचे कारण देत काम रखडले आहे. हा रस्ता सध्या नगरपंचायतीकडे वर्ग नसल्याने नगरपंचायत त्यावर निधी खर्च करू शकत नाही. आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधीची कमतरता रस्त्याचे काम मार्गी लागत नाही त्यामुळे ग्रामस्थांच्या अवस्था कात्रीत सापडल्यासारखी झाली आहे. खेडोपाडी काँक्रीटचे रस्ते होत असताना तालुक्याला जोडणारा रस्ता मात्र दयनीय अवस्थेत असल्याने वणवे ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग दरवर्षी खालापूर विश्रामगृहावर लाखोची उधळपट्टी करत आहे परंतु दोन किलोमीटर रस्ता तयार करण्यात निधी नाही हि खेदाची बाब आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता अक्षय किंजळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु ते नॉट्रिचेबल होते.

# तळा शहरात एक दिवसाआड येणारे पाणी आता दोन दिवसाआड

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहराचे गेल्या अनेक वर्षांचे पाणी टंचाईचे ग्रहण काही सुटता सुटत नाही.तळा शहराला पाणीपुरवठा हा अंबेली येथील बोअरवेल द्वारे व तळा शहरातील शेजारी असणाऱ्या धरणाच्या खालच्या बाजूला मारलेल्या बोअरवेल व्दारे पाणी पुरवठा केला जात आहे.हे एक दिवसा आड येणारे पाणी आता अनेक दिवसांपासून दोन दिवसाआड येत आहे.

सध्या दोन दिवसाआड सोडण्यात येणारे पाणी हे एक किंवा जास्तीत जास्त दीड तास येते.त्या पाण्यालाही फोर्स नसल्याने प्रत्येक कुटुंबाला पुरेल येवढे पाणी एक दिवसाआड येत नव्हते तर आताचे येणारे पाणी कसे पुरेल असा संतप्त सवाल महिलांमधून केला जात आहे.सध्या तळा शहरातील महिलांमध्ये संतापाची लाट पसरत असून केव्हाही महिला हंडा मोर्चा घेऊन नगरपंचायती वरती येऊ शकतात अशी खदखद महिलांतून ऐकावयास मिळत आहे.नवीन योजनेचे काम प्रगतीपथावर चालू असले तरी हि योजना लवकर चालू होईल का असा प्रश्न केला जात आहे

सध्याचा उन्हाळा मोठ्याप्रमाणात जाणवत असून या उन्हाळ्यातच दोन दिवसाआड पाणी येणार असल्याने पाणी समस्येला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.यामुळे आता ज्यांची परिस्थिती चांगली आहे.त्यांना खाजगी पाणी विकत घेता येईल मात्र सामान्य नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागणार असून भटकंती करून पाणी आणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.महिलावर्गातून तर आम्हाला टँकर द्वारे पाणीपुरवठा करावा अशी चर्चा होताना पहावयास मिळत आहे.

महिलांना घरातील कपडे धुणे,जेवण करणे,स्वच्छता करणे या दृष्टीने लागणारे हे पाणी कमी पडत असल्याने महिलांच्या डोक्याचा ताप वाढला असून पाणीपाणी करून महिलांच्या डोळ्यात अक्षरशः पाणी येत आहे.पाण्यामुळे स्थलांतरही होत आहेत.शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक नागरिकांला दरडोई ५५ ते ७० लीटर पाणी मिळणे आवश्यक आहे.तेही मिळत नाही.

# मोहोपाडा सोनगिरी डोंगरावर अज्ञात महिलेचा मृतदेह आढळला

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

मोहोपाडा तळेगाव हद्दीतील सोनगिरी डोंगर भागातील पाय वाटे जवळ मयत महिलेचा मृतदेह आढळला असून तीचा आकडी येवून मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे.हि महिला अंदाजे ३५ ते ४० वयोगटातील असून तिची उंची ५ फुट ४ इंच आहे.तिच्या गळ्यामध्ये काळ्या रंगाचा दोरा व



त्यात ताविद , अंगात राखाडी व पांढ–या रंगाची साडी,चॉकलेटी रंगाचा ब्लाउज,कंबरेला भगव्या रंगाचा दोरा असा वेश परिधान केला आहे.याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात अपमृत्यू रजि.न.१३/२०२६ बी.एन.एस.एस.कलम १९४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रमोद जाधव अधिक तपास करीत आहेत.सदर मयत महिलेचा वारसाचा शोध लागल्यास मो.९०२८३६११२२ यावर संपर्क साधावा असे आवाहन रसायनी पोलिसांनी केले आहे.

# मुरूड येथे डॉ. आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**मुरुड : प्रतिनिधी**

भारत रत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सवा निमित्त वीर कोंडाजी फर्जंद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुरूड येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली .

यावेळी प्रमुख वक्ते ज्येष्ठ पत्रकार मेघराज जाधव, हरिश्चंद्र नाक्ती, गणेश पालकर, स्वप्नील गुंजाळ, संकेत पालवणकर, पुजा माळी, कृष्णा भुरे, संदीप मेहकर व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते .

सर्वप्रथम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले . प्रा . जाधव



यांनी डॉ . बाबासाहेबांची बालपणापासून ची संघर्ष यात्रा कथन करून विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या शिका, संघटित व्हा व संघर्ष करा या त्री सुत्रीचे अवलंब करण्याचे आवाहन केले. यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थे तर्फे घेण्यात आलेल्या वक्तत्व , निंबध व चित्रकला स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले.

# पेण विठ्ठलनगर येथे गोरक्षणाचा उत्सव

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील विठ्ठलनगर येथे सालाबाद प्रमाणे गोरक्षणाचा उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता. शनिवार ११ एप्रिल २०२६ ते सोमवार १३ एप्रिल २०२६ पर्यंत तीन दिवस गोरक्षणाचा उत्सव सोहळा विठ्ठल नगर येथे पार पडला.

शनिवार ११ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजता अभिषेक व कलश पूजन, संध्याकाळी पाच वाजता दीपक म्हात्रे यांचा अक्कादेवी माऊली हरिपाठ मंडळ सरेबाग यांचा हरिपाठ होईल रात्री साडेनऊ वाजता हभप प्राची मंदार व्यास डोंबिवली यांचे हरिदासी कीर्तन त्यांना हार्मोनियम साथ किशोर अनंत मात्रे सर (दिव) यांची व तबला साथ जितेंद्र सर भाल विठ्ठलवाडी याची लाभली.

रविवारी १२ एप्रिल रोजी संध्याकाळी पाच वाजता हभप कुणाल ठाकूर व कावेरी ठाकूर यांचा लक्ष्मीनारायण हरिपाठ मंडळ दिव यांचा हरिपाठ, रात्री साडेनऊ वाजता कीर्तन, रात्रौ बारा वाजता सूर्यकांत म्हात्रे यांचे काळभैरव गोरक्षनाथ भजन मंडळाचा संगीत भजन, त्यांना मृदुंग साथ ज्ञानेश्वरी म्हात्रे यांची लाभली.

सोमवार १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता पुष्पवृष्टी कीर्तन, दुपारी दीड वाजता ज्योत्स्नाताई म्युझिकल ग्रुप पेण गणपती वाडीच्या सायली मानकवळे यांची संगीत भजन त्यांना पखवाजाची साथ विकी मानकवळे यांनी दिली, संध्याकाळी सहा वाजता सिद्धिविनायक भजन मंडळ शिंगणटचे संगीत भजन तसेच ओंकार पाटील बोरी पेण यांचे संगीत भजन झाले. रात्री बारा वाजता श्रींच्या प्रदक्षिणेचा कार्यक्रम होऊन उत्सवाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी ग्रामस्थांचा एकोपा दिसून आला.

# नागोठण्यात अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम



**नागोठणे : बातमीदार**

रिलायन्स उद्योग समूहाचे संचालक व अनंत युवा प्रतिष्ठानचे प्रमुख अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त नागोठणे परिसरात समाजोपयोगी उपक्रमांचा भव्य धडाका पाहायला मिळत आहे. त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रिलायन्स इंडस्ट्रीज नागोठणे यांच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार दि. १२ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता नागोठणे ते चोळे विभागासाठी दोन रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. याच कार्यक्रमात अपंग व्यक्तींना व्हीलचेअर, वॉकर व काठ्यांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अनंत युवा प्रतिष्ठानचे सचिव धीरज घुले पाटील, युवा सामाजिक कार्यकर्ते सद्दाम दफेदार, मनसे जिल्हा संघटक गोवर्धन पोलसानी, भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे, काँग्रेसचे शहर अध्यक्ष अशपाक पानसरे, शिवसेना विभाग प्रमुख प्रविण ताडकर, प्रियदर्शनी वाहतूक संस्थेचे संचालक सिराज पानसरे, विठोबाशेठ दंत, कामगार नेते संजय काकडे, अशोक भोय, उबाठा शिवसेनेचे इम्रान पानसरे, काँग्रेसचे असिफ मुल्ला, जोहेब कुरेशी, नागोठणे माजी सरपंच रियाज अधिकारी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जहूरुद्दीन सय्यद, शब्बीर पानसरे, सगिर अधिकारी, प्रकाश मोरे, भास्कर म्हात्रे,यशवंत कुथे , सामाजिक कार्यकर्त्या रंजना माळी, स्मिता कुथे आदी मान्यवरांसह नागोठणे व चोळे परिसरातील ग्रामस्थ तसेच अनंत युवा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी व स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्त ८ व ९ एप्रिल रोजी पेट्रोकेमिकल टाऊनशिप येथे सुमारे ३१ हजार लोकांसाठी स्नेहभोजन व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच परिसरातील अनेक गावांतील ग्रामस्थांनी या सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यासोबतच आदिवासी बांधवांसाठी मोफत धान्य वाटप, १५०० धान्य किट व १५०० वॉटर प्युरिफायरचे वितरण करण्यात आले. गंगावणे, चाफेवाडी, किल्लावाडी आदी सुमारे २० आदिवासी वाड्यांना याचा लाभ होणार आहे.

शालेय विद्यार्थ्यांसाठी गणवेश, शालेय बॅग, पाण्याच्या बाटल्या व चॉकलेटचे वाटप सुरू असून सुमारे ३००० विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष प्रात्यक्षिकेही आयोजित करण्यात येत आहेत.

# मुरूड संजीवनी आरोग्य सेवा संस्थेतर्फे २८ नेत्र रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**मुरुड : प्रतिनिधी**

संजीवनी आरोग्य सेवा संस्था मुरूड व मनोरमा नेत्रालय मुलुंड (पश्चिम) मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि .२९ मार्च रोजी घेण्यात आलेल्या मोफत नेत्रचिकित्सा शिबीरात१७५ रुग्णांची नेत्र चिकित्सा करण्यात आली. त्या मध्ये ५६ मोतीबिंदू रुग्ण संख्या निश्चित करण्यात आली. संजीवनी आरोग्य संस्थेने मुरुडवरून मुलुंड येथे नेत्र रुग्णांची वाहन व्यवस्था केली.


११ एप्रिल रोजी १४ पुरुष व १४ महिला यांचे मोतीबिंदूची शस्त्रक्रिया संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व नेत्र तज्ञ पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने आणि गिनीज ग्रुप ऑफ रेकॉर्ड नेत्र तज्ञ डॉ.रागिणी पारेख तसेच मनोरमा नेत्रालयाची संपूर्ण टीम यांच्या सहकार्याने एकूण २८रुग्णांची मोतीबिंदूची शस्त्रक्रिया यशस्वी पणे करण्यात आली. या कामी डॉ.रागिणी पारेख यांनी परिश्रम घेतले.

# मुरूड पंचायत समितीत गरोदर व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त पोषण आहार वितरण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

गरोदर माता व स्तनदा मातांच्या आरोग्याला प्राधान्य देत गुरूवार दि. ९ एप्रिल २०२६ रोजी अतिरिक्त पौष्टीक आहार वितरणाचा कार्यक्रमाचा शुभारंभ झाला

या उपक्रमाचा शुभारंभ पं.स. सभापती निलेश घाटवळ यांचे शुभहस्ते करण्यात आला. यावेळी उपसभापती अश्विनी जंगम,सदस्य तसेच गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांची उपस्थिती होती.मान्यवर उपस्थितांचे हस्ते लाभार्थी महिलांना अतिरिक्त पौष्टीक आहाराचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान आहाराचे महत्व समजावून सांगण्यात आले व योग्य पोषणाचे आरोग्यावर होणारे सत्कारात्मक परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी दि. ९ एप्रिल ते २३ एप्रिल दरम्यान साजरा होणाऱ्या पोषण पंधरवडाचा शुभारंभ करण्यात आला. तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या परिपत्रकाचे वाचन करून उपस्थितांना पोषण पंधरवडयाच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.



# आरसीबीकडून मुंबई इंडियन्सचा पराभव

**मुंबई : प्रतिनिधी**

वानखेडेवर रविवारी मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा संघ आमनेसामने आला. नाणेफेक हार्दिक पंड्याने जिंकली आणि प्रथम बॉलिंगचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने २४० धावांचा डोंगर उभारला. २४१ धावांचे लक्ष्यप्राप्त करताना मुंबईच्या नाकी नऊ आले. मुंबईला फक्त २२२ धावा करता आल्या आणि सामना सहज आरसीबीने १८ धावांनी जिंकला.



आयपीएल २०२६मधील आपला पहिला सामना जिंकल्यानंतर मुंबई इंडियन्सला सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने मुंबईला त्यांच्याच घरच्या मैदानावर १८ धावांनी पराभूत केले. गतविजेत्या आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना ४ गडी गमावून २४० धावा केल्या. मुंबईने चांगली सुरुवात केली, पण त्यांचा एकही फलंदाज सातत्याने मोठे फटके मारू शकला नाही. मुंबईकडून कर्णधार हार्दिक पंड्या ४० धाव करु शकला आणि शेरफन रुदरफॉर्डने ७१ धावा केल्या. संघ केवळ ५ गडी गमावून २२२ धावाच करू शकला. तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आरसीबीने फिल सॉल्ट आणि विराट कोहली यांच्या जोरावर दमदार सुरुवात केली. दोघांनी मिळून अवघ्या १०.५ षटकांत पहिल्या विकेटसाठी १२० धावा जोडल्या.

सॉल्टने आक्रमक फलंदाजी करत २१६ च्या स्ट्राईक रेटने अवघ्या ३६ चेंडूंमध्ये ७८ धावा केल्या. या खेळीत सॉल्टने सहा चौकार आणि सहा षटकार मारले. दुसऱ्या बाजूला कोहलीने ५ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५० धावा केल्या. कर्णधार रजत पाटीदारने शानदार फलंदाजी केली. त्याने केवळ २० चेंडूंमध्ये ५३ धावांची उत्कृष्ट खेळी केली. रजतने या खेळीत २६५च्या स्ट्राईक रेटने खेळताना ४ चौकार आणि ५ षटकार मारले. जितेश शर्मा ९ चेंडू खेळून केवळ १० धावाच करू शकला, मात्र शेवटच्या षटकांमध्ये टिम डेव्हिडने शानदार फलंदाजी करत २१२ च्या स्ट्राईक रेटने केवळ १६ चेंडूंमध्ये नाबाद ३४ धावा केल्या, तर रोमारियो शेफर्ड २ धावा करून नाबाद राहिला. ट्रेंट बोल्ट, मिचेल सँटनर, शार्दुल ठाकूर आणि हार्दिक पांड्या यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. आरसीबीकडून सुयश शर्माला दोन विकेट मिळाल्या, तर कृणाल पंड्या, जेकॉब डफी आणि रसिक सलामला प्रत्येकी एक विकेट मिळाली.

### सामन्यापूर्वी खेळाडूंनी वाहिली आशा भोसलेंना श्रद्धांजली

आयपीएल २०२६ चा २०वा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात खेळला जात आहे. या सामन्यात महान भारतीय गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दोन्ही संघातील खेळाडूंनी हातावर काळी पट्टी बांधली होती. तसंच सामना सुरु होण्यापूर्वी एक मिनिटाचं मौनही पाळण्यात आलं, त्यानंतर दोन्ही संघांतील खेळाडू खेळण्यासाठी मैदानात उतरले.

# आरडीसीए प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत पेण बाप्पा चॅम्पियन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुरुष टी-ट्वेन्टी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत पेण बाप्पा संघाने विजेतेपद पटकावले.



पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर समीरा हॅबिटेटेस अलिबाग जेट्स विरुद्ध पेण बाप्पा ह्या दोन संघांमध्ये अंतिम सामना खेळला गेला. पेण बाप्पा संघाचा हरहुन्नरी खेळाडू शेखर भगत याने निर्णायक दोन धावा काढून संघाला विजय मिळवून दिला. प्रथम फलंदाजी करतांना समीरा हॅबिटेटेस अलिबाग जेट्स संघाने निर्धारित वीस षटकांमध्ये ९ गडी गमावत १४६ धावसंख्या उभारली त्यामध्ये श्रेयस कुमार यांनी धडाकेबाज फलंदाजी करत सर्वाधिक ७१ धावा काढल्या त्याला मिहीर भाटकर यांनी २७,अभय पाटील १८,रितेश नलावडे यांनी १८ धावा काढून साथ दिली. पेण बाप्पा संघाकडून फिरकी गोलंदाज सागर मुळे यांनी ४ व जपजित सिंह यांनी २ फलंदाज बाद केले.१४७ धावांचे लक्ष घेऊन फलंदाजीला आलेल्या पेण बाप्पा संघाने सुरवातीपासून धावगती सुरळीत ठेवली होती सलामीवीर फलंदाज जपजित सिंह यांनी सर्वाधिक ७१ धावा काढल्या तर नील कोळी २३,विनय ठाकूर यांनी २१ धावांचे योगदान संघाला दिले. शेवटच्या षटकात पेण संघाला जिंकण्यासाठी ७ धावा हव्या असतांना सामना शेवच्या चेंडू पर्यंत गेला. शेवटच्या चेंडूवर पेण संघानी विजयासाठी आवश्यक असणाऱ्या दोन धावा काढून विजय मिळवला आहे.

स्पर्धेचे बक्षिस वितरण रायगड जिल्हा परिषदेचे कृषी विभागाचे सभापती वैकुंठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पेणचे उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सहसचिव जयंत नाईक, खजिनदार प्रशांत ओक, सदस्य अॅड. पंकज पंडित, कौस्तुभ जोशी, प्रदीप खलाटे, शंकर दळवी, अलिबाग जेट्स संघाचे मालक शरद राऊळ, अॅड.राहुल नाईक आदी उपस्थित होते.

# आरसीबीच्या कॅप्टनकडून फक्त दोन खेळाडूंचे कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६च्या २० व्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुने वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सचा १८ धावांनी पराभव केला. मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु आरसीबीच्या स्फोटक फलंदाजीसमोर त्यांची गोलंदाजी अपयशी ठरली. आरसीबीने २० षटकांत ४ गडी गमावून २४० धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात, मुंबई इंडियन्स २० षटकांत ५ गडी गमावून केवळ २२२ धावाच करू शकली.



रजत पाटीदार म्हणाला की, "हा विजय अविश्वसनीय वाटतो, विशेषतः वानखेडे येथील वातावरण पाहता; एवढ्या खचाखच भरलेल्या स्टेडियममध्ये खेळणे हा एक विशेष अनुभव आहे. ते पुढे म्हणतात की, विराट कोहली आणि फिल सॉल्ट यांनी ज्या प्रकारे डावाचा पाया रचला तो निर्णायक होता आणि त्यांनी व इतर फलंदाजांनी या संधीचा पुरेपूर फायदा घेतला. पूर्वी 'स्पिन स्पेशालिस्ट' म्हटले जाण्याबद्दल पाटीदार म्हणाला की, ते फिरकी गोलंदाजी चांगली खेळतात, त्याचप्रमाणे ते वेगवान गोलंदाजीविरुद्धही तितकेच पारंगत आहेत आणि ते आता मैदानावर दिसून येत आहे. कोहलीच्या दुखापतीबद्दल विचारले असता, सांगितले की अद्याप त्याबद्दल काहीही माहिती नाही."

या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरुने धमाकेदार सुरुवात केली. फिल सॉल्टने अवघ्या ३६ चेंडूंमध्ये ७८ धावा केल्या. विराट कोहलीने ३८ चेंडूंमध्ये ५० धावांचे योगदान दिले. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी १२० धावांची भागीदारी केली. त्यानंतर कर्णधार रजत पाटीदारने शानदार कामगिरी करत अवघ्या २० चेंडूंमध्ये ५३ धावा केल्या. त्यानंतर टीम डेव्हिडने नाबाद ३४ धावा करून संघाला या धावसंख्येपर्यंत पोहोचवले.

# घोट गावात आई गावदेवी यात्रेनिमित्त कुस्त्यांचे जंगी सामने

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घोट गावात आई गावदेवी यात्रेनिमित्त रविवारी पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक नितेश पाटील आणि भाजपचे पनवेल ग्रामीण मंडळाचे सरचिटणीस नवनाथशेठ पाटील यांच्या आयोजनातून कुस्त्यांचे जंगी सामने मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडले.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा कुस्ती संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर उपस्थित होते. यावेळी नगरसेवक सुमित झुंझारराव, दिनेश खानावकर, अजय बहिरा, प्रविण पाटील, नगरसेविका लिनाताई म्हात्रे, भाजप महिला मोर्चा अध्यक्ष दिक्षा जाधव, माजी सरपंच संतोष पाटील, सरपंच शैलेश माळी, हरिदास पाटील, दिलिप पाटील, गुरुनाथ पाटील, युवा नेता मयुरेश नेटकर, कामगार नेते प्रभुदास भोईर, वासुदेव पाटील यांच्यासह वस्ताद, पैलवान, पंच कमिटी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी आपल्या भाषणात या कुस्ती स्पर्धांचे आयोजन केल्याबद्दल नगरसेवक नितेश पाटील यांचे कौतुक केले. ते म्हणाले की, अशा स्पर्धांमुळे तरुणांमध्ये चांगल्या सवयी निर्माण होतात आणि उत्कृष्ट खेळाडू घडतात. पनवेलमध्ये गेली शंभर-दोनशे वर्षे कुस्तीची समृद्ध परंपरा असून तिला नेहमीच लोकाश्रय लाभला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी तळोजा येथे पनवेल महानगरपालिकेमार्फत सुमारे १५ हजार चौरस फूटांचे कुस्ती संकुल उभारण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच कामोठे येथे पाच हजार चौरस फूटांचे क्रीडा संकुल उभारण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

# गुजरातकडून लखनऊ सुपर जायंट्सचा पराभव

**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ च्या १९व्या सामन्यात गुजरात टायटन्सनं लखनऊ सुपर जायंट्सचा ७ गडी राखून सहज पराभव केला. भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी इकाना क्रिकेट स्टेडियमवर नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना एलएसजीनं ८ गडी गमावून १६४ धावा केल्या. गुजरातनं ८ चेंडू शिल्लक असताना सहजपणे लक्ष्य गाठलं. पहिले दोन सामने गमावल्यानंतर गुजरातचा हा सलग दुसरा विजय आहे. लखनऊ सुपर जायंट्सची विजयाची हॅटट्रिक हुकली. यासह ४ सामन्यांनंतर दोन्ही संघांचे प्रत्येकी ४ गुण आहेत.

प्रथम फलंदाजी करताना लखनऊकडून एडन मार्करम आणि मिचेल मार्श यांनी १.३ षटकांत केवळ १४ धावांची भागीदारी केली. मार्श ४ चेंडूंमध्ये ११ धावा करुन पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर मार्करमनं कर्णधार ऋषभ पंतसोबत दुसऱ्या विकेटसाठी १६ चेंडूंमध्ये ३१ धावा जोडून संघाला सावरण्याचा प्रयत्न केला. पंतनं संघाच्या खात्यात १८ धावांचं योगदान दिलं. संघानं ४५ धावांवर दोन गडी गमावले होते, त्यानंतर मार्करमनं आयुष बडोनीच्या साथीनं तिसऱ्या विकेटसाठी १७ चेंडूंमध्ये २४ धावा केल्या. मार्करम ६ चौकारांसह २१ चेंडूंमध्ये ३० धावा करुन पॅव्हेलियनमध्ये परतला, तर आयुष बडोनीनं संघाच्या खात्यात ९ धावांचं योगदान दिलं.



लखनऊ सुपर जायंट्सनं ७४ धावांवर चार गडी गमावले होते. त्यानंतर निकोलस पूरननं अब्दुल समदच्या साथीनं पाचव्या विकेटसाठी ३५ धावा जोडून संघाला शतक पूर्ण करुन दिलं. दरम्यान, पूरननं २१ चेंडूंमध्ये १९ धावा केल्या. अब्दुल समद आणि मुकुल चौधरी प्रत्येकी १८ धावा करुन पॅव्हेलियनमध्ये परतले. जॉर्ज लिंडेनं १६ धावांचं योगदान दिलं, तर मोहम्मद शमी ५ चेंडूंमध्ये १२ धावांवर नाबाद राहिला. गुजरातकडून प्रसिद्ध कृष्णानं २८ धावांत ४ बळी घेतले, तर अशोक शर्मानं २ बळी घेतले.

लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातनं सावध सुरुवात केली. साई सुदर्शन आणि शुभमन गिल यांनी ५.१ षटकांत पहिल्या विकेटसाठी ४५ धावा जोडल्या. दिग्वेश राठीनं सुदर्शनला १५ धावांवर बाद केलं. त्यानंतर शुभमन गिलसोबत जोस बटलर सामील झाला. या दोघांनी ८४ धावांची भागीदारी केली. गिलनंतर बटलरनं आपलं अर्धशतक पूर्ण केलं. गिल १५ व्या षटकात, तर बटलर १६ व्या षटकात बाद झाला. गिलनं ४० चेंडूंमध्ये ५६ धावा केल्या, तर बटलरनं ३७ चेंडूंमध्ये ६० धावा केल्या. वॉशिंग्टन सुंदरनं राहुल तेवतियासोबत मिळून १९ व्या षटकात संघाला लक्ष्यापर्यंत पोहोचवलं. लखनऊकडून मोहम्मद शमी आणि प्रिन्स यादव यांनी दिग्वेश राठी यांच्यासह प्रत्येकी एक बळी घेतला.

# सावन बरवालचा मॅरेथॉनमध्ये राष्ट्रीय विक्रम

**रॉटरडॅम : वृत्तसंस्था**

हिमाचल प्रदेशचा लांब पल्ल्याचा धावपटू सावन बरवालने रविवारी इतिहास रचला. सावन याने 'एनएन मॅरेथॉन रॉटरडॅम' शर्यतीत २ तास ११ मिनिटे ५८ सेकंद अशी वेळ देताना तब्बल ४८ वर्षांपासून अबाधित असलेला शिवनाथ सिंह याचा मॅरेथॉनचा राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला.

सावन या शर्यतीत एकूणात विसाव्या स्थानावर राहिला. मात्र, त्याने शिवनाथचा २ तास १२ सेकंदाचा ४८ वर्षे जुना विक्रम खोडून काढला. शिवनाथने १९७८ मध्ये ही कामगिरी केली होती. या शर्यतीत सहभागी झालेला दुसरा भारतीय धावपटू गोपी थोनाकल २३ व्या स्थानावर राहिला. त्याने ४२.१९५ किमी अंतर २:१३:१६ सेकंद वेळेत पूर्ण केले.




बरवालचे हे यश अधिक विशेष आहे कारण रॉटरडॅममधील ही त्याची पहिलीच अधिकृत मॅरेथॉन शर्यत होती. यापूर्वी त्याने कोणतीही अधिकृत मॅरेथॉन शर्यतीत सहभाग घेतला नव्हता. यावर्षी जानेवारीत अमेरिकेत झालेल्या जागतिक क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेनंतर ही त्याची या हंगामातील दुसरी स्पर्धा होती. भारतीय लष्करातील जवान असलेल्या बरवालने २१ किमीच्या टप्प्यावर १:०४:४३ वेळ नोंदवून २७ वे स्थान मिळवले होते, तर गोपी १:०४:४४ वेळेसह ३३ व्या स्थानावर होता. बरवालने ३५ किमीच्या टप्प्यावर १९ व्या स्थानापर्यंत झेप घेतली होती, मात्र शेवटी तो २० व्या स्थानावर राहिला.

हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील जोगिंदर नगर येथील रहिवासी असलेल्या २८ वर्षीय बरवालने अनेक वर्षे कठोर परिश्रम करून स्वतःला एक निष्णात धावपटू म्हणून सिद्ध केले आहे. त्याने मिळवलेले यश हे त्याच परिश्रमांचे फळ आहे. हिमाचलच्या डोंगराळ भागातून येत त्याने रॉटरडॅमच्या सपाट रस्त्यांवर ऐतिहासिक कामगिरी केली.

# युजवेंद्र चहल मला क्यूट म्हणतो!

## तानिया चॅटर्जीने दाखवले मेसेज





**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा स्टार क्रिकेटपटू युजवेंद्र चहल पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. आयपीएलमध्ये आपल्या कामगिरीने पंजाब किंग्जसाठी महत्त्वाची भूमिका बजावतोय, मात्र आता 'गंदी बात' फेम अभिनेत्री तानिया चॅटर्जी हिचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. ज्यामध्ये इन्स्टाचे डीएम मेसेज दाखवत तिने हे मेसेज युजवेंद्र चहलने केल्याचा दावा केला आहे. पापाराझींना तिने चहलने केलेला मेसेज दाखवला.

युजवेंद्र चहल याने माझा व्हिडीओ पाहिला आणि त्यावर मला 'क्युट' असा मेसेज केला आहे. त्यावर ती म्हणाली की, क्यूट बोलणं ही साधी गोष्ट आहे. कारण मला तर अनेकजण क्यूट बोलतात. युजवेंद्र चहलच्या मेसेजचा तानियाने व्हिडीओ दाखवला. यादरम्यान एकाने तिला विचारलं की, यावर तु काय रिप्लाय केला. तानिया म्हणाली, मी तो मेसेज खूप उशिरा पाहिला होता. तानियाचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर नेटकऱ्यांच्या संमिश्र प्रतिक्रिया पाहायला मिळाल्या.अनेकांनी युजवेंद्र चहल याला ट्रोल केले आहे. तर काहींनी मेसेजच केलाय ना, त्यामध्येही त्याने काही अपशब्द वापरले नाहीत. क्युट बोलणं हे काय चुकीचं होऊ शकत नाही.

युजवेंद्र चहल याचा आताच दोन ते तीन दिवसांपूर्वी एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. ज्यामध्ये तो त्याच्या कारमध्ये सिगरेट ओढताना दिसत होता. त्यानंतर त्याने ती पेटती सिगरेट बाहेर फेकली होती. या व्हिडीओमध्ये युजवेंद्र चहल असल्याचं पोस्ट करणाऱ्या नेटकऱ्याने म्हटलं होतं. तो व्हिडीओ कधीचा आणि कुठला याबाबतची कोणतीही माहिती समोर आलेली नव्हती. त्यावर चहलनेही काही प्रतिक्रिया दिलेली नव्हती.

# पांड्या ब्रदर्समध्ये 'ऑल इज नॉट वेल'?

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीग (IPL) २०२६ च्या एका हाय-स्कोअरिंग सामन्यात मुंबई इंडियन्स (MI) आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु (RCB) यांच्यात सामना झाला. रविवार, १२ एप्रिल रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात आरसीबीनं १८ धावांनी विजय मिळवला. सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना आरसीबीनं ४ गडी गमावून २४० धावा केल्या. मुंबई इंडियन्सनं ५ गडी गमावून २२२ धावा केल्या.





सामन्यानंतर हार्दिक पांड्या आणि कृणाल पांड्या एकमेकांना भेटले नाहीत किंवा त्यांनी हस्तांदोलनही केलं नाही. या घटनेमुळं आणखी चर्चा सुरू झाली, कारण मैदानावर दोघांमधील जवळचे नाते अनेकदा दिसून येत होते. खरं तर, या अटकळी आधीच सुरु झाल्या होत्या. नुकत्याच झालेल्या टी-२० विश्वचषकातील प्रभावी कामगिरीनंतर एकीकडे हार्दिक पांड्याचं कौतुक होत असताना, दुसरीकडे कृणाल पांड्याकडून कोणतीही ठोस प्रतिक्रिया आली नव्हती. इतकंच नाही तर, सोशल मीडियावर दोघांमध्ये दुरावा असल्याचे संकेत मिळत होते, जसं की त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा न देणं आणि वैयक्तिक कार्यक्रमांमध्ये वेगवेगळं दिसणं.

# 'सरळ मैदानाबाहेर जा...!' सुनील गावसकर आरसीबीच्या खेळाडूवर भडकले

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातील सामना प्रेक्षकांसाठी रोमहर्षक ठरला आहे. पण या सामन्यात झालेल्या एका घटनेने सुनील गावस्कर यांना राग अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. आरसीबीचा वेगवान गोलंदाज रासीख सलाम दार याला आलेल्या क्रॅम्प्समुळे खेळ वारंवार थांबवावा लागला. मात्र, यामुळे गावसकर संतापले आणि त्यांनी रासीख सलाम दार मैदानावर जाण्याचा सल्ला दिला.



मुंबई इंडियन्सच्या डावातील १६ व्या षटकादरम्यान रासीख सलाम दारला गोलंदाजी करताना तीन वेळा क्रॅम्प आला. एकाच षटकात तीनवेळा वैद्यकीय मदत घ्यावी लागल्याने खेळाचा वेग मंदावला. यामुळे मुंबई इंडियन्सच्या फलंदाजांची लय बिघडत होती आणि सामन्याचा वेळही वाया जात होता. या गोष्टी सुनील गावसकर यांना खटकल्या आणि त्यांनी लाईव्ह सामन्यातच आरसीबीच्या संघाला खडेबोल सुनावले.

"जर एखाद्या खेळाडूला वारंवार क्रॅम्प येत असेल तर, मैदानाबाहेर जा, उपचार घ्या आणि मगच परत या. उर्वरित षटक दुसऱ्या गोलंदाजाकडून पूर्ण करून घ्यावे. पण इथे वेगळच सुरू आहे. एकाच षटकात तीनवेळा फिजिओ मैदानात येतोय. वारंवार याच गोष्टी करत बसायच्या का? सवाल गावसकर यांनी विचारला. गावसकरांच्या मते, जर खेळाडूला त्रास होत असेल तर त्याने वेळ न घालवता मैदान सोडावे, जेणेकरून खेळाची गती कायम राहील. अखेर पंचांनी हस्तक्षेप करत रासीखला गोलंदाजी करण्यापासून रोखले, कारण नियमानुसार दुखापतीनंतर मैदानाबाहेर गेलेल्या खेळाडूला ठराविक वेळ मैदानावर राहिल्याशिवाय पुन्हा गोलंदाजी करता येत नाही. अखेरचे षटक रोमारिओ शेफर्डने पूर्ण केले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com